नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २९३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com






महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026






शुक्रवार, दि. ०९ ऑक्टोबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक




## नाना पाटेकरांना अखेरचा निरोप देण्यासाठी राजकीय तसेच सिनेक्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकार डोणजे गावात



### नटसम्राट अनंतात विलीन

### डोणजेत शासकीय इतमामात नाना पाटेकरांना अखेरचा निरोप

### हजारोंच्या जनसागराच्या साक्षीने अंत्यसंस्कार; मुलगा मल्हारने दिला मुखाग्नी

### 'नाना पाटेकर अमर रहे'च्या घोषणांनी दुमदुमले डोणजे

पुणे : (स. गांवकरी)

आपल्या दमदार अभिनयाने मराठी रंगभूमी, मराठी चित्रपटसृष्टी आणि हिंदी चित्रपटसृष्टीवर अमीट ठसा उमटविणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर अखेर अनंतात विलीन झाले. वयाच्या ७५व्या वर्षी गोव्यात हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांचे पार्थिव पुणे जिल्ह्यातील डोणजे येथील फार्महाऊसवर आणण्यात आले. महाराष्ट्र सरकारने त्यांच्या कला क्षेत्रातील अतुलनीय योगदानाचा गौरव करत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला. डोणजे येथे हजारो चाहत्यांच्या, नागरिकांच्या, कलाकारांच्या आणि मान्यवरांच्या उपस्थितीत नाना पाटेकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

नाना पाटेकर यांचा मुलगा मल्हार पाटेकर याने त्यांना मुखाग्नी दिला. यावेळी उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते. 'नाना पाटेकर अमर रहे' अशा घोषणांनी डोणजे परिसर दुमदुमून गेला. आपल्या लाडक्या कलावंताला शेवटचा निरोप देण्यासाठी पुण्यासह महाराष्ट्राच्या विविध भागांतून नागरिक डोणजेत दाखल झाले होते. मृत्यूपूर्वी पहाटे सुमारे अडीच वाजता नाना पाटेकर यांनी एका मित्राला आपण अस्वस्थ असल्याचा संदेश पाठविला होता. मित्राला हा संदेश काही वेळाने दिसल्यानंतर तो त्यांच्या निवासस्थानी पोहोचला. त्यावेळी नाना अस्वस्थ अवस्थेत असल्याचे समोर आले. त्यानंतर तातडीने वैद्यकीय मदत घेण्यात आली; मात्र डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतरही त्यांना वाचवता आले नाही.

नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली. गोव्यातील वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांचे पार्थिव पुण्याकडे रवाना करण्यात आले. विशेष व्यवस्थेद्वारे पार्थिव पुण्यात आणण्यात आले आणि त्यानंतर डोणजे येथील त्यांच्या फार्महाऊसवर नेण्यात आले.

डोणजे येथील फार्महाऊसशी नाना पाटेकर यांचे विशेष नाते होते. याच ठिकाणी त्यांनी अनेक वर्षे निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवला. अखेर याच भूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

ज्या कलाकाराने आपल्या अभिनयातून असंख्य भूमिका जिवंत केल्या, त्याच कलाकाराला अखेरचा निरोप देताना अनेकांच्या भावना अनावर झाल्या. नाना पाटेकर यांच्या जाण्याने केवळ चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता गेला नसून, मराठी मातीशी घट्ट नाळ असलेला एक संवेदनशील कलावंत हरपल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

नाना पाटेकर यांच्या अंत्यदर्शनासाठी राजकीय, सामाजिक आणि कलाक्षेत्रातील अनेक मान्यवर डोणजे येथे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रामदास आठवले, सुनील तटकरे, माधुरी मिसाळ, गोपीचंद पडळकर, अर्जुन खोतकर, रुपाली चाकणकर, सदाभाऊ खोत आणि उदय सामंत यांच्यासह अनेक मान्यवरांनी नाना पाटेकर यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेतले आणि पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

चित्रपटसृष्टीतील मकरंद अनासपुरे, नागराज मंजुळे, नीना कुलकर्णी, प्रवीण तरडे, सुरेश वाडकर, पुरुषोत्तम बेर्डे, सुशांत शेलार, लेखक अरविंद जगताप यांच्यासह अनेक कलाकार आणि सहकाऱ्यांनीही आपल्या सहकाऱ्याला भावपूर्ण निरोप दिला. नाना पाटेकर यांच्या सामाजिक कार्याशी जोडलेल्या 'नाम' संस्थेचे प्रतिनिधीही यावेळी उपस्थित होते.

नाना पाटेकर हे केवळ अभिनेता नव्हते, तर आपल्या प्रत्येक भूमिकेला स्वतंत्र ओळख देणारे कलावंत होते. रंगभूमीपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीपर्यंत पोहोचला. गंभीर भूमिका असो, खलनायक असो, संवेदनशील व्यक्तीरेखा असो किंवा सामान्य माणसाचे जगणे पडद्यावर उभे करणे असो—नानांच्या अभिनयात वास्तवाचा स्पर्श जाणवत असे.

त्यांच्या संवादफेकीत एक वेगळी धार होती. चेहऱ्यावरचे भाव, आवाजातील चढ-उतार आणि भूमिकेत पूर्णपणे सामावून जाण्याची त्यांची शैली यामुळे त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीत स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. 'क्रांतिवीर', 'परिंदा', 'अग्निसाक्षी', 'यशवंत', 'अब तक छप्पन', 'नटसम्राट' यांसारख्या अनेक चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांच्या स्मरणात कायम राहतील. त्यांच्या अभिनयाला राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. ते तीन वेळा राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराचे मानकरी ठरले होते. नाना पाटेकर यांच्या कारकिर्दीतील 'नटसम्राट' ही भूमिका विशेष ठरली. या भूमिकेतून त्यांनी रंगभूमीवरील एका महान अभिनेत्याच्या अंतर्मनातील संघर्ष, एकाकीपणा आणि आयुष्याच्या उत्तरार्धातील वेदना अत्यंत प्रभावीपणे पडद्यावर मांडल्या.

विशेष म्हणजे, 'नटसम्राट' या भूमिकेशी संबंधित एक योगायोग त्यांच्या निधनानंतर पुन्हा चर्चेत आला आहे. यापूर्वी एका कार्यक्रमात नाना पाटेकर यांनी 'नटसम्राट'च्या भूमिकेशी संबंधित कलाकारांच्या निधनाबाबत भाष्य केले होते. मात्र, त्यांच्या निधनाशी त्याचा कोणताही संबंध जोडणे योग्य ठरणार नाही.

समाजसेवेचीही वेगळी ओळख

अभिनयाइतकेच नाना पाटेकर यांचे सामाजिक कार्यही महत्त्वाचे होते. दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि ग्रामीण समाजासाठी त्यांनी काम केले. 'नाम' संस्थेच्या माध्यमातून जलसंधारण, शेतकरी आणि ग्रामीण भागातील विविध प्रश्नांवर त्यांनी प्रत्यक्ष काम उभे केले.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हा सामाजिक पैलू त्यांच्या चाहत्यांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहिला. प्रसिद्धीच्या झोतात राहूनही समाजातील सामान्य माणसाशी जोडलेले राहण्याचा प्रयत्न त्यांनी कायम केला. निधनाच्या काही दिवस आधी, ४ ऑक्टोबर रोजी गोव्यातील एका कार्यक्रमात नाना पाटेकर यांनी जीवन आणि मृत्यूबाबत चिंतन करणारे वक्तव्य केले होते. 'आपण सगळ्यांनाच एक दिवस जायचे आहे' आणि 'उद्या मी असेन की नाही, हे मला माहीत नाही,' अशा आशयाचे विचार त्यांनी व्यक्त केले होते. त्यांच्या निधनानंतर हे शब्द पुन्हा चर्चेत आले आणि चाहत्यांच्या भावनांना अधिकच उधाण आले. नाना पाटेकर यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका प्रभावी पर्वाचा अंत झाला आहे. त्यांनी साकारलेल्या भूमिका, त्यांची संवादफेक, त्यांचा रोखठोक स्वभाव, अभिनयातील सहजता आणि समाजासाठी काम करण्याची त्यांची तळमळ यामुळे ते कायम स्मरणात राहतील.

डोणजेच्या मातीत नाना पाटेकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले आणि एका महान कलाकाराचा जीवनप्रवास थांबला. मात्र, त्यांनी रंगभूमीवर आणि रुपेरी पडद्यावर उभ्या केलेल्या असंख्य व्यक्तिरेखा पुढील अनेक पिढ्यांच्या स्मरणात राहतील.

**नाना गेले; पण 'नटसम्राट' म्हणून त्यांनी कमावलेले अढळ स्थान कधीही जाणार नाही.**

**अलविदा नाना...**

### गोव्यात पहाटे काळजाचा ठोका चुकला

नाना पाटेकर यांचे ८ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे गोव्यातील दोनापावला येथील निवासस्थानी निधन झाले. अचानक प्रकृती बिघडल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयातील डॉक्टरांनी सुमारे ४५ मिनिटे त्यांना वाचविण्याचे प्रयत्न केले; मात्र उपचारांना प्रतिसाद मिळाला नाही. त्यांना पहाटे सुमारे ५.२० वाजता मृत घोषित करण्यात आले. रुग्णालयाने हृदयविकाराचा झटका हे मृत्यूचे कारण असल्याचे सांगितले.

### अंतिम दर्शनासाठी चाहत्यांचा महासागर

नानांच्या निधनाची बातमी कळताच चाहत्यांनी डोणजेकडे धाव घेतली. सकाळपासूनच परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. नानांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी लांबच लांब रांगा लागल्या. अनेक चाहत्यांच्या हातात नानांचे छायाचित्र होते, तर अनेक जण अश्रू अनावर झाल्याने भावुक झाले होते.







महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय



**डॉ. विश्वासराव आरोटे**
संपादक - दै. समर्थ गांवकरी

# नाना गेले... पण ‘नाना’ नावाची जादू कायम राहील!



नाना पाटेकर हे केवळ अभिनेते नव्हते; ते पडद्यावर जगणारे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीने एक प्रभावी कलाकार गमावला आहे. मात्र, त्यांच्या अभिनयातून निर्माण झालेली असंख्य पात्रे, संवाद आणि आठवणी रसिकांच्या मनात कायम जिवंत राहतील.

नानांचा अभिनय हा केवळ संवादफेकीपुरता मर्यादित नव्हता. त्यांच्या चेहऱ्यावरचा भाव, डोळ्यांतील तीव्रता, आवाजातील चढ-उतार आणि देहबोली यांतून ते पात्र अक्षरशः प्रेक्षकांसमोर उभे करायचे. ‘क्रांतिवीर’, ‘परिंदा’, ‘अग्निसाक्षी’, ‘नटसम्राट’, ‘अब तक छप्पन’ अशा विविध चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका त्यांच्या अभिनयाची व्यापकता दाखवतात.

नानांच्या व्यक्तिमत्त्वात एक वेगळीच रांगडेपणाची ताकद होती. ते पडद्यावर आले की प्रसंगाचे गांभीर्य वाढायचे. त्यांच्या आवाजात आक्रमकता होती; पण त्याच आवाजात माणुसकीची ऊबही होती. म्हणूनच त्यांच्या भूमिका केवळ पाहिल्या जात नव्हत्या, त्या अनुभवल्या जात होत्या.

विशेष म्हणजे नानांनी लोकप्रियतेच्या चौकटीत स्वतःला कधी बंदिस्त केले नाही. कलावंत म्हणून प्रयोग करण्याची, वेगवेगळ्या भूमिका स्वीकारण्याची आणि सामाजिक वास्तवाला भिडण्याची त्यांची वृत्ती कायम दिसून आली. त्यामुळेच त्यांची कारकीर्द केवळ चित्रपटांच्या यादीत मोजता येत नाही; ती भारतीय अभिनयाच्या एका स्वतंत्र पर्वासारखी आहे.

आज नाना आपल्यात नसतील, तर एक प्रश्न मनात उमटतो कलाकार जातो, पण त्याची कला कुठे जाते?

उत्तर नानांच्या बाबतीत अगदी स्पष्ट आहे. त्यांची कला त्यांच्या चित्रपटांत आहे, त्यांच्या संवादांत आहे, त्यांनी साकारलेल्या पात्रांत आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या अभिनयातून प्रभावित झालेल्या लाखो रसिकांच्या आठवणींत आहे.

काळ पुढे जाईल. नवे कलाकार येतील. अभिनयाच्या शैली बदलतील. चित्रपटांचे तंत्रज्ञान बदलेल. पण ‘नाना पाटेकर’ हे नाव अभिनयातील एका अस्सल पर्वाची आठवण करून देत राहील.

नाना गेले...
पण त्यांनी साकारलेली माणसं अजूनही आपल्याशी बोलत राहतील.
त्यांचा आवाज पडद्यावर पुन्हा पुन्हा घुमत राहील.
आणि प्रत्येक वेळी मनाच्या एका कोपऱ्यातून आवाज येईल—
“अलविदा नाना...
तुम्ही पडद्यावरून गेलात, आमच्या मनातून कधीच जाणार नाही.”

## थोडक्यात पण महत्वाचे



### डिंभे माणिकडोह बोगदा होऊ देणार नाही : निकम यांनी मांडली भूमिका

मंचर (स. गांवकरी) : देवदत्त निकम यांनी आज राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. यावेळी डिंभे माणिकडोह बोगद्याला आंबेगाव, शिरूर आणि जुन्नर तालुक्यातील जनतेचा ठाम विरोध असल्याची त्यांना माहिती दिली. तसेच आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित सिंचन योजनांच्या संदर्भात त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी काही मागण्या मांडल्या त्या पुढील प्रमाणे : १) डिंभे माणिकडोह बोगदा रद्द करावा.२) आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील उपसा सिंचन योजना मंजूर कराव्यात. त्यांचा चौथ्या सुप्रमामध्ये समावेश करावा. आदिवासी भागातील जनतेसाठी राखीव असलेले ६ % पाणी त्यांना मिळालेच पाहिजे.३) सातगाव पठाराला कळमोडी धरणातील पाणी उपसा सिंचन करून तत्काळ उपलब्ध करून द्यावे. ते शक्य नसल्यास डिंभे धरणातील अतिरिक्त पाणी उपसा सिंचन करून सातगाव पठाराला द्यावे.४) पहाडदरा, लोणी व धामणी परिसरातील गावांसाठी डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यावरील म्हाळसाकांत योजनेचा चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेमध्ये समावेश करावा. ५) डिंभे धरणाच्या डाव्या कालव्याची दुरुस्ती करून तो पूर्ण क्षमतेने चालवावा. ६) पिंपळगाव जोगा धरणाप्रमाणे माणिकडोह धरणाच्या पश्चिमेकडून समुद्राकडे वाहून जाणारे पाणी अडवून माणिकडोहच्या साठ्यात वळवावे. ७) थिटेवाडी धरणामध्ये पाणी सोडण्यात यावे.यावेळी तालुकाध्यक्ष धोंडीभाऊ भोर, शेतकरी संघटनेचे माऊली ढोमे, युवक तालुकाध्यक्ष विशाल वाबळे, संजय बढेकर, संजय खांडगे, भिकाजी जाधव पाटील, तेजस जाधव, सनी घावटे आदी उपस्थित होते.



### महिला शेतकरी प्रमाणपत्र शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; १५६ महिलांची नोंदणी

मुखेड (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अभियानांतर्गत मोफत महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला २०० हून अधिक नागरिकांनी भेट दिली असून १५६ महिला शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली. या शिबिराचे आयोजन युवा कार्यकर्ते रोहित संभाजी बलुरे यांनी केले. कृषी विभागाचे कृषी अधिकारी पी. एस. मैलारे यांनी उपस्थित महिला शेतकऱ्यांना महिला शेतकरी प्रमाणपत्राचे महत्त्व व त्याचे फायदे याबाबत मार्गदर्शन केले. महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महिला शेतकऱ्यांना शासकीय योजना, अनुदान, कृषी कर्ज, पीक विमा, प्रशिक्षण तसेच विविध कृषी सेवांचा लाभ सुलभपणे मिळण्यासाठी हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे. महिलांनी शासनाच्या विविध योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.ग्रामीण भागातील शासनाच्या योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी अशा शिबिरांचे आयोजन आवश्यक असल्याचे चंद्रकांत बलुरे यांनी सांगितले. यावेळी ज्ञानेश्वर वळगे, बालाजी मुंडकर, बालाजी आळे, महेश आळे, तानाजी गंडमळे, अक्षय गंडमळे, नरसिंग चिडगिर यांच्यासह ग्रामस्थ व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आगामी दुर्गा महोत्सव शांततेत साजरे करा : पोलीस निरीक्षक अशोक जाधव



नवीन नांदेड (स. गांवकरी) : आगामी दुर्गा उत्सव सण शांततेत साजरा करण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन पोलिस निरीक्षक अशोक जाधव यांनी आयोजित आगामी दुर्गा महोत्सव मंडळ निमित्ताने शांतता समितीच्या बैठकीत केले, यावेळी दुर्गा महोत्सव मध्ये महिला व युवती यांना संरक्षण देण्यात येणार असल्याचे असल्याचे सांगून डिजे बंदी असल्याचे सांगितले. आगामी दुर्गा नवरात्र महोत्सव निमित्ताने ग्रामीण पोलीस स्टेशन येथे शांतता समिती , सार्वजनिक दुर्गा मंडळ पदाधिकारी पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्यी बैठक 8 सप्टेंबर रोजी पोलिस निरीक्षक अशोक जाधव यांच्या उपस्थितीत संपन्न झाली यावेळी आगामी दुर्गा महोत्सव मंडळा संदर्भात सुचना देण्यात आल्या.

## पालच्या हरीण पैदास केंद्रात नवजीवनाची चाहूल!

रावेर : (स. गांवकरी)



तालुक्यातील पाल येथे मागील वर्षी १४ सांबरांच्या मृत्यूमुळे चर्चेत आलेल्या पाल येथील हरीण पैदास केंद्रात आता सुखद वार्ता आली आहे. २१ सप्टेंबर रोजी एका मादी सांबराने नर पिल्लाला जन्म दिल्याने केंद्रातील वातावरणात पुन्हा चैतन्य निर्माण झाले आहे. अवघ्या पंधरा दिवसांच्या या नव्या पाहुण्याने केंद्रातील वातावरणाशी चांगलेच जुळवून घेतले असून, तो मादी व नर सांबरांसोबत दिवसभर धावत-बागडताना दिसत आहे. मागील वर्षी ६ ते ९ फेब्रुवारी २०२५ दरम्यान याच केंद्रातील तब्बल १४ सांबरांचा मृत्यू झाला होता. प्राथमिक माहितीनुसार, चाऱ्यातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. काही सांबरांमध्ये पचनशक्ती क्षीण होणे तसेच घटसर्पाची लक्षणेही आढळून आली होती. या घटनेनंतर केंद्रातील सांबरांची देखभाल, चारा व पाण्याची उपलब्धता याबाबत नागरिक आणि वन्यजीवप्रेमींकडून चिंता व्यक्त करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर नव्या नर पिल्लाचा जन्म हा वन्यजीवप्रेमींसाठी दिलासादायक ठरला आहे. पिल्लू सध्या निरोगी असून, कधी मादी सांबराच्या मागे तर कधी नर सांबराच्या सोबतीने परिसरात धावताना-बागडताना दिसत आहे. त्याच्या मुक्त वावरामुळे केंद्रातील वातावरण पुन्हा प्रसन्न झाले आहे. रावेर वनपरिक्षेत्र अधिकारी शंकर कवठे यांनी सांगितले की, २१ सप्टेंबर रोजी हरीण पैदास केंद्रात नर सांबराच्या पिल्लाचा जन्म झाला आहे. या पिल्लासह केंद्रातील इतर सांबरांचीही काटेकोरपणे दक्षता घेतली जात असून, त्यांचे योग्य संगोपन व संवर्धन करण्यात येत आहे. मृत्यूच्या वेदनादायी आठवणींनंतर नव्या नर पिल्लाच्या जन्माने पालच्या हरीण पैदास केंद्रात प्राण्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे वन्यजीव प्रेमिंना दिसुन येत आहे.

## अध्यात्म आणि निसर्ग यांची सांगड घालून पर्यटनाचा आनंद देणारे व्यक्तिमत्व म्हणजे महेश मालक इंगळे - बापूसाहेब निंबाळकर सर



अक्कलकोट : (स. गांवकरी)

अध्यात्म आणि निसर्ग यांची सांगड घालून पर्यटनाचा आनंद देणारे व्यक्तिमत्व म्हणजे महेश मालक इंगळे आहेत असे मनोगत हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशालेचे माजी मुख्याध्यापक बापूसाहेब निंबाळकर सर यांनी व्यक्त केले.

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन - नगरसेवक महेश मालक इंगळे - प्रथमेश मालक इंगळे यांच्या वतीने जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून पार पडलेल्या अहिल्या नगर जिल्ह्यातील भंडारदरा येथील सहलीच्या समारोप सोहळया प्रसंगी हा दौरा यशस्वी करण्यासाठी अखंडपणे परिश्रम घेणारे चडचणकर ट्रॅव्हल्सचे मृगेंद्र चडचणकर, चंद्रकांत ब्रह्मा, जगदीश चडचणकर, सोमानाथ बंडू चडचणकर, अजित कोकणे, संतोषकुमार तडवळे सर, तसेच बाला का रिसॉर्टचे सुधीर शिंदे, प्रितम शिंदे, सहकारी वाघमोडे, स्वातीताई कुसळे, अजय पवार, दिनेश देशमुख, कैलास सजभोर, सागर देशमुख यांचा नगरसेवक महेश मालक इंगळे, प्रथमेश मालक इंगळे यांनी श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, मानधन देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी माजी मुख्याध्यापक बापूसाहेब निंबाळकर सर यांनी बोलताना वरील भावोद्गार काढले. पुढे बोलताना माजी मुख्याध्यापक बापूसाहेब निंबाळकर सर म्हणाले की नगरसेवक महेश मालक इंगळे हे मित्र परिवाराला एकत्र घेऊन, निसर्गाच्या सानिध्यात नेऊन माणसाला माणसाशी जोडण्याचे काम करतात. या भंडारदरा दौऱ्यातून आम्हाला निसर्गाचे खरे रूप, सह्याद्रीची श्रीमंती आणि मित्रत्वाची खरी ताकद अनुभवायला मिळाली. महेश मालक व प्रथमेश मालक यांचे नियोजन हे नेहमीच वाखाणण्याजोगे असते असेही मनोगत व्यक्त केले. यावेळी सुरेश वाले सर, अविनाथ कंधारे, श्रीकृष्ण गवळी यांनीही आपले मनोगत व्यक्त करून दौऱ्याचे अनुभव कथन केले. या सांगता सोहळ्याप्रसंगी महेश मालक इंगळे, प्रथमेश मालक इंगळे यांच्यासह मित्र परिवारातील पराणे , शिवपुत्र हळगोदे, श्रीशैल गवंडी, अंकुश केत, सुनिल पवार, ज्ञानेश्वर भोसले, बाबा सुरवसे, श्रीकांत झिपरे, विद्याधर गुरव सर, डॉ. राजू मलंग, राजू स्वामी, अमोल माने मेजर, प्रा. शिवशरण अचलेर सर, रामलिंगय्या स्वामी, बाळासाहेब एकबोटे, राजाभाऊ इंगळे वैराग, विजय जगताप, सुरेश वाले सर, बापूजी निंबाळकर सर, अरविंद पाटील पत्रकार, खाजप्पा झंपले, सत्यजित लोके सर, संजय इंगळे, रमेश शिंदे, महेश मरकले, तुषार मोरे, स्वप्निल गायकवाड, साहिल पवार, आदित्य गवंडी, आशिष गजधने, युवराज सोनटक्के, लखन गवळी, तन्मय इचगे, ओंकार महाडीक, समर्थ स्वामी, सागर गोंडाळ, श्रीकांत मलवे, स्वामीनाथ मुसळे, आकाश चुंगीकर, अथर्व शिंदे, सागर कटकधोंड, रजत गायकवाड, दिपक गवळी, स्वराज जाधव, रोहन पवार, समर्थ गवळी, राम लोणारी आदी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. शिवशरण अचलेर सर यांनी केले, तर आभार श्रीकांत झिपरे, व ज्ञानेश्वर भोसले यांनी मानले.

## ठाण्यात २.७२ कोटींची 'व्हेलची उलटी' ; महिलेसह दोघे अटकेत

ठाणे : (स. गांवकरी)



**२ किलो ७२० ग्रॅम अंबरग्रीस जप्त**

उच्च प्रतीचे अत्तर तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या व्हेल माशाच्या उलटीसदृश अंबरग्रीसची तब्बल २ कोटी ७२ लाख रुपये किमतीची खेप विक्रीसाठी ठाण्यात आणणाऱ्या महिला व पुरुषाला ठाणे गुन्हे शाखेच्या युनिट-१ ने अटक केली. आरोपींकडून २ किलो ७२० ग्रॅम वजनाचे अंबरग्रीस जप्त करण्यात आले आहे. या कारवाईने ठाण्यातील बेकायदा वन्यजीव व्यापाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

ठाणे गुन्हे शाखा युनिट-१ मधील पोलिस हवालदार गणेश बडगुजर यांना या व्यवहाराची माहिती मिळाली होती. माहितीची खातरजमा केल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजता जांभळी नाका, ठाणे पश्चिम येथे अंबरग्रीसची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील अंदाजे किंमत २ कोटी ७२ लाख रुपये आहे. अत्तरनिर्मितीमध्ये त्याला मोठी मागणी असल्याचे सांगितले जाते. याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध ठाणे नगर पोलीस ठाण्यात वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मधील कलम ३९, ४४, ४८, ४९ (ब), ५७, ५१ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणे पश्चिम येथील हायलॅन्ड रेसिडेन्सी लॉजजवळ सापळा रचला. या कारवाईत मयुर विश्वास पाटील (रा. कोल्हापूर) आणि मिनाक्षी मधुकर मोहिते (रा. सिंधुदुर्ग) यांना ताब्यात घेण्यात आले. अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे २ किलो ७२० ग्रॅम वजनाचे अंबरग्रीस आढळून आले. युनिट १ चे वपोनि अनिल शिंदे, पोलिस निरीक्षक अमोल वालझडे, पोलीस उपनिरीक्षक सुभाष मोरे, हवालदार गणेश बडगुजर, व्यंकट धायगोडे आणि शेखर तडवी, आदींच्या पथकाने सापळा रचून मयूर आणि मीनाक्षी या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरुद्ध ठाणे नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भिवंडीत चर्चासत्र व कार्यशाळा उत्साहात

भिवंडी : (स. गांवकरी)



बामसेफ, डीएस फॉर आणि बहुजन समाज पार्टी, भिवंडी लोकसभा यांच्या संयुक्त विद्यमाने भिवंडी येथील टिळक वाचन मंदिर येथे बहुजन समाजाच्या राजकीय, सामाजिक व वैचारिक जागृतीसाठी चर्चासत्र व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय नागरिकांना दिलेला मतदानाचा मूलभूत अधिकार, लोकशाही व्यवस्था आणि बहुजन समाजाची राजकीय भूमिका या विषयांवर कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीतील नागरिकांच्या सहभागाचा महत्त्वाचा आधार असून, त्याबाबत समाजामध्ये जनजागृती करण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमात बसपाचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव अशोक गायकवाड यांनी प्रमुख मार्गदर्शक केले. तसेच सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी ना. पा. जाधव, सेवानिवृत्त नायब तहसीलदार यशवंत गायकवाड आणि बसपाचे ठाणे जिल्हा कोषाध्यक्ष नसीम शेख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी लोकशाहीचे संरक्षण, मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व, बहुजन समाजाची राजकीय जाणीव आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार याबाबत मान्यवरांनी आपले विचार मांडले. बहुजन समाजाने वैचारिकदृष्ट्या जागृत होऊन सामाजिक व राजकीय परिवर्तनाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. सदर कार्यक्रमाला अनंत पाटील, सुधाकर पाटील, विजय पाटील आणि संतोष लोकरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विलास पाटील, विनोद जाधव आणि महेंद्र गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## १९व्या यलो रिबन NGO फेअर प्रस्तुत ‘कला कृषी बाजार’चा पुण्यात समारोप

### २० हून अधिक राज्यांतील १५० हून अधिक संस्था आणि ३,००० हून अधिक उत्पादनांचे प्रदर्शन

पुणे : (स. गांवकरी)



इशान्या फाउंडेशनतर्फे NABARDच्या भारत ग्राम उत्सवाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या 19व्या ‘कला कृषी बाजार’ या उपक्रमाचा पुण्यात उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. भारतभरातील कारागीर, शेतकरी, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक उद्योजकांना एकत्र आणणाऱ्या या पाच दिवसीय उपक्रमात 20 हून अधिक राज्यांतील 150 हून अधिक सहभागी संस्था आणि 3,000 हून अधिक उत्पादने सहभागी झाली. पारंपरिक हस्तकला, हातमाग, कृषी उत्पादने, शाश्वत उत्पादने आणि विविध प्रादेशिक खाद्यपदार्थ अनुभवण्याची तसेच त्यामागील समुदायांशी थेट संवाद साधण्याची संधी यामुळे पुणेकरांना मिळाली. समारोप सोहळ्यातील प्रमुख आकर्षण म्हणजे ‘अतुल्य योगदान पुरस्कार 2026’ प्रदान करण्यात आले. कृषी, ग्रामीण विकास आणि समुदाय सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा या पुरस्काराद्वारे गौरव करण्यात आला.

‘कृषीभूषण’ म्हणून परिचित असलेले विजय अण्णा बोराडे यांना मराठवाड्यातील पावसावर आधारित शेती, जलसंधारण आणि दुष्काळप्रवण भागांसाठी उपयुक्त शेती पद्धतींमध्ये दिलेल्या योगदानाबद्दल गौरविण्यात आले. मराठवाडा शेती सहाय्य मंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून त्यांनी कृषी शिक्षण, जलव्यवस्थापन आणि ग्रामीण समुदायांना सक्षम करणाऱ्या तळागाळातील विविध उपक्रमांवर सातत्याने काम केले आहे. तसेच शाश्वत कृषी पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

यावेळी दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (DFPCL) चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. सैलेश मेहता म्हणाले, “यावर्षीचे अतुल्य योगदान पुरस्कार प्राप्त मानकरी तळागाळातील नवोन्मेषाच्या माध्यमातून ग्रामीण उपजीविकेत परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता अधोरेखित करतात.

जलसंधारण, हवामानाच्या आव्हानांना तोंड देणारी शेती आणि शेतकरी उद्योजकतेच्या विकासासाठी त्यांचे कार्य ठोस आणि दीर्घकालीन परिणाम घडवत आहे. इशान्या फाउंडेशन आणि कला कृषी बाजाराला या प्रयत्नांचा गौरव करताना तसेच स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या परिवर्तनाच्या प्रेरणादायी कथा व्यापक स्तरावर पोहोचवताना अभिमान वाटतो.”

इशान्या फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती पारुल मेहता म्हणाल्या, “यावर्षीच्या कला कृषी बाजाराच्या माध्यमातून इशान्या फाउंडेशनने अर्थपूर्ण प्रगती घडवून आणणाऱ्या कल्पना आणि उपक्रमांना ओळख देण्याची आणि त्यांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची आपली बांधिलकी अधोरेखित केली आहे.

नवोन्मेष, उद्योजकता आणि शाश्वत विकासाला चालना देणाऱ्या व्यक्तींच्या प्रयत्नांचा गौरव करून हे व्यासपीठ केवळ त्यांच्या यशाचा सन्मान करत नाही, तर अधिक सक्षम ग्रामीण अर्थव्यवस्था उभारण्यासाठी व्यापक सहभागालाही प्रेरणा देते.”

# थोडक्यात पण महत्वाचे



## सहा रायडर्सनी जवळून अनुभवले केटीएमचे मोटोजीपी पॅडॉक

पुणे (स. गांवकरी) : प्रो कॅटेगरीमध्ये पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर राहिलेले योहान इमॅन्युएल आणि मोहम्मद मिकाइल, अमेचर कॅटेगरीमधील टॉप दोन रायडर्स कार्तिक आर आणि जोबिन खारमलकी तसेच विमेन्स कॅटेगरीमध्ये पहिल्या आणि दुसऱ्या स्थानावर राहिलेल्या लानी झेना फर्नांडिस आणि सायमाह एजाज बेग यांनी ऑस्ट्रियाचा दौरा केला. कोईम्बतूरमधील कारी मोटर स्पीडवे येथे केटीएम कप सीझन ३ ची सांगता झाल्यानंतर या सहा रायडर्सना ऑस्ट्रियाला जाण्याची संधी मिळाली. ऑस्ट्रियामध्ये त्यांना रेसिंगची एक वेगळी बाजू अनुभवता आली. केटीएम रेसिंग फॅक्टरी आणि केटीएम मोटोहॉल येथे रेसिंगच्या पडद्यामागे चालणारे काम त्यांनी जवळून पाहिले. त्याचबरोबर मोटोजीपी वीकेंडसाठी केली जाणारी तयारी, त्यासाठी आवश्यक असलेला संवाद आणि टीमवर्क यांचाही त्यांना अनुभव घेता आला. योहान इमॅन्युएलसाठी केटीएम रेसिंग फॅक्टरीची भेट म्हणजे रेसिंग सीझनमध्ये ट्रॅकपासून दूर पडद्यामागे होणाऱ्या विविध कामांची माहिती घेण्याची संधी होती. त्याला केटीएमचा डकारमधील वारसाही जवळून जाणून घेता आला.

## जुन्नर आदिवासी भागातील ११५ लिटर हातभट्टीची दारू जप्त

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागातील शिरोलीपूर येथे रोडच्या डाव्या बाजूला बेकायदेशीर बिगर परवाना ११५ लिटर गावठी हातभट्टी दारू जप्त करून पोलीस पथकाने कारवाई केलेली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की , रस्त्याच्या बाजूला असणार्या एका लाकड्याच्या सफरात अडोशाला आरोपी मोहन आबाजी सुपे वय ४६ वर्षे रा. शिरोलीपूर येथे उग्र वासाच्या १२,५०० रु किमतीचे काळ्या रंगाचे टायरच्या ५ ट्युबा आढळल्या आहे. यामध्ये प्रत्येकी एका ट्यूब मध्ये २० लिटर याप्रमाणे एकूण १०० लिटर १२५ रुपये प्रति लिटर प्रमाणे गावठी हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली . या ठिकाणी ९०० /- रुपये किमतीच्या एकूण १५ बिसलरी बॉटल प्रत्येकी बॉटल १ लिटर प्रमाणे ६० रुपये प्रति लिटर प्रमाणे गावठी हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली . येथील विनापरवाना बेकायदा बिगर परवाना दारूचा माल स्वतःच्या ताब्यात बाळगल्याने मुंबई प्रोव्हीबिशन ॲक्ट कलम ६५ प्रमाणे फिर्याद नोंद करून आरोपीस ताब्यात घेण्यात आलेले आहे . सदरची कारवाई पोलीस उपविभागीय अधिकारी धनंजय पाटील , पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्या आदेशाने स. पो. नि. मोरे, पो. शि अमोल सातपुते,बापू वाघमोडे, संजय भोसले या पथकाने कारवाई केलेली आहे.

## विवोने भारतात एक्स फोल्ड६ लाँच केला




नवी दिल्ली (स. गांवकरी) : विवो इंडियाने आज आपला नवीनतम फोल्डेबल स्मार्टफोन, विवो एक्स फोल्ड६ लाँच केला, जो फ्लॅगशिप स्मार्टफोनच्या अनुभवाला मल्टीटास्किंगसाठी तयार केलेल्या एका शक्तिशाली उत्पादकता वर्कस्पेसमध्ये रूपांतरित करतो. ओरिजिनओएस ७, प्रगत एआय टूल्स, फ्लॅगशिप झाईस इमेजिंग आणि ६९००mAh क्षमतेची मोठी बॅटरी यांसारख्या वैशिष्ट्यांसह, एक्स फोल्ड६ अशा व्यावसायिकांसाठी फ्लॅगशिप फोटोग्राफी आणि एक शक्तिशाली उत्पादकता अनुभव घेऊन येतो, ज्यांना प्रवासात असताना काम करायचे आहे, नवनिर्मिती करायची आहे आणि कनेक्टेड राहायचे आहे. एक्स फोल्ड६ चा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी ओरिजिन वर्कबेंच आहे, जे मोठ्या फोल्डेबल डिस्प्लेला एकाच वेळी अनेक ॲप्स व्यवस्थापित करण्यासाठी एका लवचिक वर्कस्पेसमध्ये रूपांतरित करते. एआय क्रॉस-ॲप ड्रॅगच्या मदतीने, वापरकर्ते ॲप्समध्ये सहजपणे माहिती हस्तांतरित करू शकतात, जसे की प्रतिमेमधून मजकूर काढून तो थेट भाषांतरासाठी दुसऱ्या ॲपमध्ये ड्रॅग करणे, ज्यामुळे दैनंदिन मल्टीटास्किंग अधिक जलद आणि सोपे होते. एआय-शक्तीवर चालणारी साधने मीटिंग, फाइल व्यवस्थापन आणि वाचन यांसारखी कामे देखील सोपी करतात. उत्पादकतेच्या पलीकडे, एक्स फोल्ड६ मध्ये विवो-झाईस संयुक्तपणे विकसित केलेली इमेजिंग सिस्टीम आहे, ज्यामध्ये झाईस एपीओ टेलीफोटो कॅमेरा आणि २०० मेगापिक्सेलचा झाईस मुख्य कॅमेरा आहे, ज्यामुळे फ्लॅगशिप फोटोग्राफी आणि व्हिडिओ क्षमता फोल्डेबल स्वरूपात उपलब्ध होतात.

## फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेजच्या १३ व्या पर्वाची ९ ऑक्टोबर पासून सुरुवात

नवी दिल्ली (स. गांवकरी) : भारतातील स्वदेशी ई-कॉमर्स मार्केटप्लेस फ्लिपकार्टने आज 'द बिग बिलियन डेज २०२६' ची घोषणा केली असून, हा सेल ९ ऑक्टोबर रोजी त्याच्या १३ व्या पर्वाच्या रुपाने परत येत आहे. टीबीबीडी भारतातल्या सर्वात मोठ्या सणासूदीच्या निवडींपैकी एक असून यांत विक्रमी संख्येने विक्रेते सहभागी होणे, एआय-आधारित खरेदीचा अनुभव आणि फ्लिपकार्टचे आजपर्यंतचे सर्वात मोठे पुरवठा साखळी नेटवर्क असलेल्या ई कार्ट आणि फ्लिपकार्ट मिनीट्स च्या देशभरातील ८,२०० हून अधिकच्या फुलफिलमेंट सेंटर्स आणि वितरण श्रृंखलेचा लाभ एकत्रितपणे मिळणार आहे. प्लस, ब्लॅक आणि फ्लिपकार्ट क्रेडिट कार्ड सदस्यांसाठी अर्ली ॲक्सेस ८ ऑक्टोबरपासून सुरू होईल. फ्लिपकार्ट ग्रुपचे सीईओ कल्याण कृष्णमूर्ती यांनी सांगितले " तेरा वर्षांपूर्वी भारतात डिजिटल कॉमर्स हे एक नाविन्य होते. आजमितीस, या पायाभूत सुविधा बनल्या आहेत. द बिग बिलियन डेज कदाचित या बदलाचे साक्षिदार बनलेल्या ५०० दशलक्षांहून अधिक नोंदणीकृत ग्राहक, १.४ दशलक्ष विक्रेते आणि देशाच्या लेह आणि कारगिल पर्यंत असलेल्या समाजापर्यंत पोहोचले असून जवळजवळ ७५,००० कर्मचारी हे फ्लिपकार्टच्या सणासूदीच्या दिवसांसाठी जोडले जाणाऱ्या लोकांसाठी आहे.

## मिशन आर्थ्रायटिस इंडिया आणि सेंटर फॉर ऱ्हुमॅटिक डिसीजेसची जनजागृती

पुणे (स. गांवकरी) : जागतिक आर्थ्रायटिस दिनानिमित्त मिशन आर्थ्रायटिस इंडिया (माई) आणि सेंटर फॉर ऱ्हुमॅटिक डिसीजेस ( सीआरडी) यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच पुण्यातील कॅम्प येथील द पूना क्लब येथे विशेष जनजागृती कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाची संकल्पना द मूव्हिंग फाउंडेशन - फूट अँड अँकल इन आर्थ्रायटिस ही होती. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (पुणे शाखेच्या) उपाध्यक्ष ॲड.अवलोकिता माने या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या. याप्रसंगी माईच्या अध्यक्ष राणी पारसनीस, सचिव अबोली बुरांडे , सीआरडीचे संचालक आणि प्रमुख संधिवात तज्ज्ञ डॉ. अरविंद चोप्रा, संधिवात तज्ज्ञ डॉ. वैजयंती लागू जोशी आणि ऑर्थोटिक्स तज्ज्ञ संजीव कश्यप, माईच्या श्वेता कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

# युवाशक्ती व जनसहभागातून मिळणार बळ

### 'टीबी मुक्त भारत अभियान' अंतर्गत 'जोश' (JOSH) पथकाचा ठाणे जिल्हा परिषदेत दिमाखदार शुभारंभ

ठाणे (स. गांवकरी)



भारत सरकारच्या 'टीबी मुक्त भारत अभियानाला' अधिक गती देण्यासाठी तसेच क्षयरोग निर्मूलनाच्या राष्ट्रीय मोहिमेत समाजाचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने ठाणे जिल्हा परिषदेत 'जोश' (JOSH – Joint Squad for Health) पथकाचा शुभारंभ आज, दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. दिनेश सुतार, जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) सल्लागार डॉ. ज्योती साळवे, जिल्हा परिषद केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. दैवशाला बलशेठवाड, एनसीसी कमांडर बिपिन धुमाळे, 'माय भारत' (MY Bharat) प्रतिनिधी सुनील गमरे, एनसीसी कॅडेट्स, माय भारत स्वयंसेवक तसेच राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी 'जोश' पथकातील सदस्यांचे टीबी मुक्त भारत अभियानाबाबत संवेदनशीलता व जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सांगितले की, क्षयरोगाचे निर्मूलन करण्यासाठी केवळ आरोग्य यंत्रणेचे प्रयत्न पुरेसे नसून समाजातील प्रत्येक घटकाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. 'जोश' पथकाच्या माध्यमातून युवक गावागावात आणि वॉर्ड पातळीवर पोहोचून क्षयरोगाबाबत जनजागृती करतील. संशयित रुग्णांना वेळेत तपासणी व उपचारासाठी प्रवृत्त करणे, क्षयरुग्णांना समुपदेशन व मनोसामाजिक आधार देणे तसेच निक्षय मित्रांच्या सहभागास प्रोत्साहन देणे, यामध्ये या पथकांची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक ब्लॉक व वॉर्ड स्तरावर पाच 'माय भारत' स्वयंसेवक आणि पाच एनसीसी कॅडेट्स अशा दहा सदस्यीय 'जोश' पथकाची निर्मिती करण्यात येणार आहे. वर्ग-१ दर्जाच्या नोडल अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली या पथकांचे नियोजन व समन्वय करण्यात येईल. पथकातील सदस्य घरोघरी तसेच गावपातळीवर जाऊन क्षयरोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, तपासणी व उपचार याबाबत जनजागृती करतील. संशयित रुग्णांना आरोग्य केंद्रांशी जोडण्यासाठीही ते आरोग्य विभागाला क्षेत्रीय पातळीवर सहकार्य करतील.

# तुमच्या प्रत्येक 'बडी'ला बदाम भेट द्या

पुणे : (स. गांवकरी)




या दिवाळीत, कॅलिफोर्निया बदाम आपली नवीन सणासुदीची मोहीम 'प्रत्येक बडीसाठी बदाम' लाँच करत असून, ग्राहकांना त्यांच्या दिवाळीच्या भेटवस्तूंच्या यादीचा नव्याने विचार करण्याचे एक कारण देत आहे. एका उत्साही म्युझिकल फिल्मद्वारे सादर करण्यात आलेली ही मोहीम तरुण ग्राहकांना त्यांच्या नेहमीच्या कौटुंबिक यादीच्या पलीकडे पाहण्याचे आणि त्यांच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अनेक मित्रांनाही बदाम भेट देण्याचे आवाहन करते—वर्क बडींपासून जिम बडींपर्यंत, ट्रॅव्हल बडींपासून कॉफी बडींपर्यंत आणि त्याही पुढे. दिवाळी हा भारतातील भेटवस्तू देण्याच्या सर्वात मोठ्या प्रसंगांपैकी एक आहे. त्याच वेळी, लोक भेटवस्तू कशा देतात आणि कोणाला देतात, यामध्येही बदल होत आहे. नव्या पिढीसाठी, पहिली नोकरी सुरू करणे, नवीन शहरांमध्ये राहणे आणि आपले असे मित्रांचे वर्तुळ तयार करणे, जे आता निवडलेले कुटुंब बनले आहेत, यामुळे सणासुदीच्या भेटवस्तूंची यादी आता नातेवाईक आणि औपचारिक संबंधांच्या पलीकडेही विस्तारली आहे. 'प्रत्येक बडीसाठी बदाम' ही मोहीम बदाम भेट देण्याच्या परंपरेला आणखी एक पाऊल पुढे घेऊन जाते. ही म्युझिकल फिल्म विविध रंगतदार व्यक्तिरेखांच्या माध्यमातून या मोहिमेला जिवंत करते. यामध्ये प्रत्येक पार्टीमध्ये नेहमीच आपल्या भन्नाट डान्स मूव्ह्जने रंगत आणणारा पार्टी बडी, नेहमीच साहसासाठी तयार असणारा ट्रॅव्हल बडी, आणि प्रत्येक प्रसंगी आपुलकीसोबत मजाही घेऊन येणारा तो "कूल आंटी" बडी यांचाही समावेश आहे!

# महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला UBLचा मोठा हातभार

मुंबई : (स. गांवकरी)

HEINEKEN कंपनीचा भाग असलेल्या United Breweries Limited (UBL) ने महाराष्ट्र राज्य सामाजिक-आर्थिक परिणाम मूल्यांकन (SEIA) अहवाल प्रसिद्ध केला. Steward Redqueen या संस्थेने केलेल्या स्वतंत्र अभ्यासानुसार, FY2024-25 मध्ये UBL च्या मूल्यसाखळीमुळे महाराष्ट्रभर अंदाजे ₹5,900 कोटींच्या मूल्यवृद्धीला आणि 36,900 रोजगाराच्या संधींना आधार मिळाला. यावरून कंपनीचे योगदान केवळ तिच्या स्वतःच्या व्यवसायापेक्षा कितीतरी व्यापक असल्याचे दिसून येते. या अभ्यासानुसार, FY2024-25 मध्ये महाराष्ट्रात UBL च्या पेयांच्या 23 दशलक्ष केस विकल्या गेल्या. United Breweries Limited चे MD & CEO, विवेक गुप्ता म्हणाले, "महाराष्ट्र राज्य सामाजिक-आर्थिक परिणाम मूल्यांकनामुळे राज्यातील UBL च्या उपस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक मूल्याचे अधिक स्पष्ट आकलन आम्हाला मिळते. आमचे कर्मचारी आणि स्थानिक पुरवठादारांपासून ते आमच्या संपूर्ण मूल्यसाखळीतील वितरकांपर्यंत, या मूल्यांकनातून या संबंधांची व्यापकता अधोरेखित होते. हे स्थानिक संबंध अधिक मजबूत करणे, उपजीविकेला आधार देणे आणि ज्या समुदायांमध्ये व परिसंस्थांमध्ये आम्ही कार्यरत आहोत, त्यांना योगदान देणे यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत."

# ₹१६.३७ कोटींच्या अपहाराची CBI, ED मार्फत चौकशी करा!

किनवट : (स. गांवकरी)



येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात आदिवासींच्या विकासासाठी उपलब्ध झालेल्या निधीतून तब्बल १६.३७ कोटी रुपयांचा कथित अपहार आणि मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची केंद्रीय तपास यंत्रणांमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी आक्रमक मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे किनवट तालुकाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी तहसीलदारांमार्फत भारताच्या राष्ट्रपतींकडे निवेदन सादर केले.

**पैसा कोणाच्या खात्यात गेला? 'फॉरेन्सिक ऑडिट'ची मागणी**

या निवेदनात प्रकाश राठोड यांनी म्हटले आहे की, निधीच्या मंजुरीपासून ते प्रत्यक्ष रक्कम काढण्यापर्यंतच्या संपूर्ण व्यवहारांची सखोल चौकशी करण्यात यावी. ही रक्कम नेमकी कोणाच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात आली आणि याचे अंतिम लाभार्थी कोण होते, याचा तातडीने आर्थिक मागोवा (Money Trail) घेण्यात यावा. यासाठी संबंधित बँक खाती, धनादेश, व्हाऊचर, बिले, लेजर, कॅशबुक, मंजुरी आदेश, उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificates), लाभार्थी याद्या आणि डिजिटल व्यवहारांची कसून तपासणी करावी.

तसेच, आवश्यकता भासल्यास या संपूर्ण आर्थिक व्यवहारांचे 'फॉरेन्सिक ऑडिट' (Forensic Audit) करण्यात यावे. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असल्याने याची चौकशी केंद्रीय अन्वेषण विभाग (CBI), अंमलबजावणी संचालनालय (ED), नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांसारख्या सक्षम यंत्रणांमार्फतच व्हावी, असा आग्रह त्यांनी धरला आहे.

या कथित गैरव्यवहारात सहभागी असलेल्या अधिकारी, कर्मचारी, संबंधित पदाधिकारी आणि समिती सदस्यांची भूमिका तपासून घ्यावी. यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, तसेच त्यांच्यावर कडक विभागीय आणि आर्थिक कारवाई करण्यात यावी. विशेष म्हणजे, या गैरव्यवहारातून जर संबंधितांनी कोणतीही मालमत्ता खरेदी केली असेल, तर कायद्यानुसार ती मालमत्ता त्वरित जप्त किंवा अटॅच (Attach) करण्यात यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. आदिवासी बांधवांच्या हक्काच्या निधीचे संरक्षण व्हावे, यासाठी भविष्यात स्वतंत्र लेखापरीक्षण (Audit), लाभार्थींची पडताळणी, डिजिटल व्यवहारांचे नियमित परीक्षण करणारी एक कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्यात यावी, जेणेकरून अशा गैरप्रकारांना आळा बसेल, असेही प्रकाश राठोड यांनी शेवटी नमूद केले आहे.

# तामसात सार्वजनिक मुताऱ्यांचा अभाव; महिला-मुलींची मोठी गैरसोय

- तामसात सार्वजनिक मुतारीच नाही; महिला-मुलींची मोठी गैरसोय
- २५ हजार लोकसंख्या, ५० गावांशी दररोज संपर्क; बाजारपेठेत लघुशंकेसाठी आडोसा शोधण्याची वेळ..
- महिन्याकाठी लाखो रुपये कर वसुली असून ग्रामपंचायत ची तिजोरी रिकामीच?

तामसा : (स. गांवकरी)



नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाची बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या तामसा शहराची लोकसंख्या सुमारे २५ हजारांच्या घरात असून, दररोज परिसरातील जवळपास ५० गावांतील नागरिकांचा विविध कामानिमित्त तामसा येथे संपर्क असतो. मात्र एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात सार्वजनिक मुतारी आणि स्वच्छतागृहांची पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

तामसा येथील जुन्या बसस्थानक परिसरात एक सुलभ शौचालय व मुतारीची सुविधा आहे. मात्र शहरातील इतर प्रमुख ठिकाणी सार्वजनिक मुतारीची व्यवस्था नसल्याचे चित्र आहे. विशेषतः महिला व मुलींसाठी ही समस्या अधिक गंभीर बनली आहे.

तामसा बसस्थानक परिसरातही महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. बाजारपेठेत खरेदीसाठी अथवा विविध शासकीय व खासगी कामांसाठी येणाऱ्या महिला आणि मुलींना लघुशंकेसाठी आडोसा शोधण्याची वेळ येत आहे. अनेकदा उघड्यावर लघुशंका करण्याची वेळ येत असल्याने महिलांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या मूलभूत गरजांकडेही दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

तामसा हे परिसरातील नागरिकांसाठी प्रमुख बाजारपेठेचे ठिकाण असून, ग्रामीण भागातून येणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि प्रवाशांची संख्या मोठी आहे. अशा परिस्थितीत शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ, बसस्थानक आणि गर्दीच्या ठिकाणी स्वच्छ, सुरक्षित व स्वतंत्र सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी करणे गरजेचे आहे. 'स्वच्छ भारत'चा संदेश देताना प्रत्यक्षात सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा मात्र अपुरी राहणे, ही नागरिकांसाठी चिंतेची बाब आहे.

संबंधित ग्रामपंचायत व प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तामसा शहरात ठिकठिकाणी सार्वजनिक मुतारी व महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.. ग्रामीण भागातून येणाऱ्या मुलींच्या सोयसुविधा नसल्याने मोठी कुंचुम्बना होत आहे विद्यार्थिनींना बस स्थानकात बसची वाट पाहताना तासोन तास वाट पाहावं लागत असून नैसर्गिक क्रिया साठी सुलभ शौचालया स्वच्छतागृह बस स्थानकात नसल्याने मोठी गैरसोयी होत आहे.

# एचवायबीई कडून वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडियाची घोषणा

पुणे : (स. गांवकरी)

एचवायबीई आपला प्रमुख जागतिक संगीत महोत्सव वीवर्स कॉन फेस्टिव्हल प्रथमच भारतात घेऊन येत आहे. 27–28 मार्च 2027 रोजी नवी दिल्ली येथे हा महोत्सव आयोजित करण्यात येणार असून, कोरियाबाहेर प्रथमच या महोत्सवाचे आयोजन भारतात होणार आहे. दोन दिवस चालणारा वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडिया एचवायबीई चा खास थेट संगीताचा अनुभव भारतात घेऊन येणार आहे. या महोत्सवात भारतातील तसेच जगभरातील नामांकित कलाकार, नेत्रदीपक संगीत सादरीकरणे आणि चाहत्यांच्या संस्कृतीचा उत्साहपूर्ण जल्लोष एकाच मंचावर पाहायला मिळणार आहे. भारतीय चाहत्यांसाठी हा महोत्सव एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक क्षण ठरणार असून,




भारतीय चाहत्यांसाठी, हा महोत्सव देशातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या के-पॉप महोत्सवांपैकी एक असेल. जागतिक सुपरफॅन प्लॅटफॉर्म वीवर्सच्या माध्यमातून विकसित झालेल्या इमर्सिव्ह फॅन अनुभवातून प्रेरणा घेत, हा महोत्सव केवळ लाईव्ह परफॉर्मन्सपुरता मर्यादित राहणार नाही. एका प्रत्यक्ष ठिकाणी संगीत, चाहत्यांचा परस्परसंवादी सहभाग, ब्रँड ॲक्टिव्हेशन्स आणि सांस्कृतिक अनुभव यांचा अनोखा संगम या महोत्सवात पाहायला मिळणार आहे. कलाकार आणि त्यांच्या चाहतावर्गातील नातेसंबंधावर आधारित या महोत्सवात चाहत्यांना संपूर्ण अनुभवादरम्यान कलाकार तसेच इतर चाहत्यांशी संवाद साधण्याच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

# डॉ. वर्धमान कांकरिया यांची जगातील टॉप ५० नेत्रतज्ज्ञांमध्ये निवड

पुणे : (स. गांवकरी)



पुणे शहरासाठी तसेच भारतीय नेत्ररोगतज्ज्ञ क्षेत्रासाठी अभिमानाची बाब म्हणजे, ख्यातनाम नेत्रतज्ज्ञ डॉ. वर्धमान कांकरिया यांची अमेरिकेतील प्रतिष्ठित एक्सपर्टस्केप यूएसए या जागतिक संस्थेकडून जगातील सर्वोत्तम ५० नेत्रतज्ज्ञांमध्ये निवड करण्यात आली आहे. एक्सपर्टस्केप ही संस्था वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन, वैज्ञानिक प्रकाशने, शैक्षणिक प्रभाव आणि जागतिक वैद्यकीय प्रगतीतील योगदान यांच्या आधारे जगभरातील तज्ज्ञ डॉक्टरांची क्रमवारी निश्चित करणारी आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त संस्था आहे. पुण्यातील एशियन आय हॉस्पिटलचे संचालक डॉ. वर्धमान कांकरिया यांना २०१० पासून मोतीबिंदू आणि नंबर कमी करण्याच्या शस्त्रक्रिया (Refractive Surgery) क्षेत्रातील उल्लेखनीय आंतरराष्ट्रीय योगदानासाठी हा सन्मान मिळाला आहे. लॅसिक (LASIK), रोबोटिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि अत्याधुनिक दृष्टी सुधारणा शस्त्रक्रियांमध्ये ते भारतातील अग्रगण्य नेत्रतज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. या प्रतिष्ठित यादीमध्ये एआयआयएमएस (AIIMS) दिल्लीच्या प्रा. डॉ. नम्रता शर्मा तसेच बंगळुरूचे डॉ. रोहित शेट्टी यांचाही समावेश आहे.

# 'मिशन भरारी' अंतर्गत शिष्यवृत्ती सराव चाचणी उत्साहात संपन्न

- इयत्ता चौथी, सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग
- शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी जिल्हा परिषद ठाणेचा उपक्रम

ठाणे : (स. गांवकरी)



शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासोबतच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या स्वरूपाचा सराव करून देणे आणि परीक्षेची तयारी अधिक प्रभावीपणे करण्याच्या उद्देशाने शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे आणि open Link foundation यांच्या तांत्रिक सहकार्याने 'मिशन भरारी – शिष्यवृत्ती सराव चाचणी' दि. ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्ह्यातील केंद्रस्तरावर घेण्यात आली. 'मिशन भरारी – शिष्यवृत्ती सराव चाचणी'साठी जिल्ह्यातील इयत्ता चौथी, सातवी व आठवी (NMMS) मिळून एकूण १०,०६६ विद्यार्थी उपस्थित राहिले.

या सराव चाचणीमुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेपूर्वी आपल्या तयारीचे मूल्यमापन करण्याची, परीक्षेच्या स्वरूपाचा सराव करण्याची तसेच ज्या विषयांमध्ये अधिक सरावाची आवश्यकता आहे, त्या बाबी ओळखण्याची संधी उपलब्ध झाली.

'मिशन भरारी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्याची क्षमता विकसित करणे, नियमित सरावाची सवय लावणे आणि शिष्यवृत्ती परीक्षेत अधिकाधिक विद्यार्थी सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे, यावर भर देण्यात येत आहे. सराव चाचणीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वातावरणाचा अनुभव मिळून आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांच्या नियोजनातून 'मिशन भरारी – शिष्यवृत्ती सराव चाचणी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील संबंधित शिक्षण विभागाचे अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, शिक्षक आणि संबंधित यंत्रणांनी या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सहकार्य केले.

या उपक्रमाला पालकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाला. आपल्या मुलांना शिष्यवृत्ती परीक्षेपूर्वी प्रत्यक्ष परीक्षेसारख्या वातावरणात सरावाची संधी मिळाल्याने तसेच त्यांच्या तयारीचे मूल्यमापन करता आल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी अशा प्रकारचे नियमित सराव उपक्रम राबविणे उपयुक्त ठरत असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २९४ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई...
AVP NEWS
समर्थ गांवकरी NEWS
संपादक : डॉ.विश्वास आनंदराव आरोटे
मा.नानजीभाई खेमजीभाई ठक्कर
न्याय, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता... हीच आमची ओळख!

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
जनरेटर विक्री | दुरुस्ती व देखभाल | तज्ञ तंत्रज्ञ | विश्वासाई सेवा वेळेत काम
संपर्क +91-8286562340 / 9004511593 8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5 Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com | Website: www.adarshengineering.net

शुक्रवार दि. ०९ ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## दुष्काळाबाबत महाराष्ट्र सरकारकडून केंद्रीय पथकासमोर सादरीकरण

मुंबई (समर्थ गांवकरी)

**राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन पथक गुरुवारपासून महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या दौऱ्यात पावसाची स्थिती, शेतीपिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न यांचा जिल्हानिहाय आढावा घेतला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने केंद्रीय पथकासमोर दुष्काळी परिस्थितीचे सविस्तर सादरीकरण केले.**

केंद्राच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली हे पथक महाराष्ट्रात दाखल झाले आहे. कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग यांसह विविध विभागांतील प्रशासकीय आणि तांत्रिक अधिकारी पथकात आहेत. पथकाच्या मुंबईतील आगमनानंतर सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या उपस्थितीत बैठक झाली. पावसाच्या कमतरतेमुळे राज्यातील काही भागांत निर्माण झालेली पाणीटंचाई, आगामी काळातील टँकरची गरज, शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजूर आणि जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांच्या स्थलांतराची शक्यता तसेच शेतकरी आत्महत्यांची परिस्थिती याकडे मुख्य सचिवांनी केंद्रीय पथकाचे लक्ष वेधले.

मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव विनिता वेद-सिंगल यांनी राज्यातील पावसाची स्थिती, अल निनोमुळे हवामान आणि पावसावर झालेला परिणाम तसेच शेतीपिकांच्या नुकसानीची तांत्रिक माहिती सादर केली. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेचाही आढावा यावेळी देण्यात आला. कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह आणि आयुक्त सूरज मांढरे यांनी पिकांचे नुकसान आणि जिल्हानिहाय परिस्थितीची माहिती पथकासमोर मांडली. पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती तसेच पुढील सात महिन्यांत निर्माण होऊ शकणाऱ्या परिस्थितीची माहिती दिली. राज्यात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवरही परिणाम झाला आहे.

सध्या टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा, मागील तीन वर्षांतील पाण्याची तुलनात्मक स्थिती आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी प्रस्तावित गावांची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन आणि भूजल सर्वेक्षण व विकास आयुक्त रवींद्र खेबुडकर यांनी दिली.

जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, रोजगार हमी योजनेचे सचिव अप्पासाहेब धुळाज तसेच ऊर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांनीही सद्यस्थिती आणि आगामी सात महिन्यांतील संभाव्य परिस्थितीचा आढावा सादर केला. लघुपाटबंधारे तलाव, गावांतील पाण्याचे स्रोत आणि त्यांच्या सद्यस्थितीची माहितीही पथकाला देण्यात आली. प्रत्यक्ष पाहणीसाठी विविध पथकेराज्य सरकारने सादर केलेली आकडेवारी, उपलब्ध पुरावे आणि विविध विभागांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे केंद्रीय पथकाने प्रत्यक्ष पाहणीचे नियोजन केले. राज्यातील विविध भागांत जाऊन दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईची पाहणी करण्यासाठी पथकातील अधिकाऱ्यांची विविध पथकांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. जास्तीत जास्त क्षेत्राचा प्रत्यक्ष आढावा घेण्याचे नियोजन असून, स्थानिक अधिकारी, तज्ज्ञ आणि राज्य शासनाचे संबंधित अधिकारीही या पाहणीवेळी उपस्थित राहणार आहेत. प्रत्यक्ष पाहणी पूर्ण केल्यानंतर केंद्रीय पथक मुंबईत परतणार असून, ११ ऑक्टोबर रोजी दुष्काळी



परिस्थितीबाबत पुढील सविस्तर चर्चा होणार आहे. या पाहणीच्या माध्यमातून राज्यातील दुष्काळाची वस्तुस्थिती, शेतीपिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि आवश्यक उपाययोजनांची माहिती केंद्र सरकारसमोर मांडली जाणार आहे.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अण्णा हजारे- मंत्री विखे पाटील यांच्यात जलव्यवस्थापनावर चर्चा!

राळेगणसिद्धी (समर्थ गांवकरी)

**ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राळेगणसिद्धी येथे भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीत पाणीटंचाई, दुष्काळी परिस्थिती आणि भविष्यातील जलव्यवस्थापनाच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली. दुष्काळाचा सामना करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता जलसंधारणाच्या कामांना अधिक प्राधान्य देण्याच्या अण्णा हजारे यांच्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन मंत्री विखे पाटील यांनी दिले.**



अण्णा हजारे उपचारासाठी मुंबईतील रुग्णालयात दाखल असताना मंत्री विखे पाटील यांनी त्यांची भेट घेतली होती. उपचारानंतर अण्णा हजारे पुन्हा राळेगणसिद्धी येथे आल्याचे समजल्यानंतर पारनेर येथील टंचाई आढावा बैठक आटोपून मंत्री विखे पाटील यांनी यादवबाबा मंदिरात त्यांची भेट घेतली. यावेळी विनायक देशमुख, सुजित झावरे, अशोकराव सावंत उपस्थित होते. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने चर्चा करताना शासनाकडून सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती मंत्री विखे पाटील यांनी अण्णा हजारे यांना दिली. गावागावांत पाणी अडविणे, पाणी जिरविणे, नाला खोलीकरण, बंधारे उभारणे, गाळ काढणे तसेच उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करण्यावर सातत्याने भर देण्याची गरज अण्णा हजारे यांनी अधोरेखित केली. पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते स्थानिक पातळीवर अडवून भूजलपातळी वाढविण्यासाठी व्यापक प्रयत्न होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

राळेगणसिद्धीमध्ये यापूर्वी झालेल्या जलसंधारणाच्या कामांमुळे तसेच वृक्षलागवड आणि पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे दुष्काळी परिस्थितीतही परिसरातील वनराई टिकून असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी नमूद केले. दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलसंधारण, पाण्याचा काटकसरीने वापर आणि लोकसहभाग या तीनही बाबींना केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक गावात कामे करण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता लोकसहभागातून व्यापक चळवळ उभी राहण्याची गरज असल्याचे अण्णा हजारे यांनी स्पष्ट केले.

## शेठ नानजीभाई ठक्कर यांच्या वाढदिवसानिमित्त राजीव गांधी विद्यालयाला सतरंजी भेट!

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील राजीव गांधी माध्यमिक विद्यालय येथे शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी सतरंजी भेट देण्यात आली. विद्यालयातील शिक्षक पापळ सर यांच्याकडे ही सतरंजी सुपूर्द करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे उपस्थित होते. शेठ नानजीभाई ठक्कर यांच्या सामाजिक बांधिलकीतून शैक्षणिक क्षेत्राला सातत्याने मदत केली जात असून, विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन करण्यात आलेल्या




या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

## दुष्काळग्रस्त महाराष्ट्राची केंद्रीय पथकांकडून पाहणी सुरू

मुंबई (समर्थ गांवकरी)

खरीप हंगामातील दुष्काळ आणि पिकांच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे ११ सदस्यांचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्रात दाखल झाले असून, गुरुवारपासून प्रत्यक्ष क्षेत्रभेटींना सुरुवात झाली आहे. दुष्काळग्रस्त भागातील पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि अन्य परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन त्याचे मूल्यांकन पथकाकडून करण्यात येणार आहे.

### ११ सदस्यांचे पथक राज्यात दाखल

कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग यांसह संबंधित विभागांतील अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे. कृषी व शेतकरी कल्याण विभागातील पीक विमा विषयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल हे पथकाचे नेतृत्व करीत आहेत. क्षेत्रभेटीसाठी केंद्रीय पथकाचे तीन गट करण्यात आले आहेत. पहिल्या पथकाकडून अहिल्यानगर, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांतील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली जाणार आहे. दुसरे पथक छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांत जाऊन पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईचा आढावा घेणार आहे. तिसरे पथक नागपूर, यवतमाळ तसेच लगतच्या टंचाईग्रस्त भागांची पाहणी करणार आहे.

## संक्षिप्त

### नाशिकमधील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामांना वेग

**नाशिक:** अवघ्या काही दिवसांवर नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळा येऊन ठेपला आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये विकास कामं केली जात आहे. येत्या ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी ध्वजारोहन करून नाशिक-त्र्यंबकेश्वरमधील कुंभमेळ्याला सुरूवात होणार आहे. आता अशातच कुंभमेळ्याच्या आधी त्र्यंबकेश्वर मंदिराचे विकास कामं हाती घेण्यात येणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याआधी त्र्यंबकेश्वर मंदिरातील काम पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारने २ महिने मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. नेमकी अद्याप तारीख जाहीर करण्यात आली नसून येत्या काही दिवसांमध्ये तारीख करण्यात येणार आहे. त्र्यंबकेश्वर मंदिर नेमकं केव्हापासून बंद होणार आहे? याची माहिती मंदिर प्रशासनाने किंवा राज्य शासनाने अजूनही दिलेली नाही. पण त्र्यंबकेश्वर मंदिर पुढील २ महिने बंद राहणार असल्याची माहिती नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री आणि कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी जिल्हा प्रशासनाला सूचना दिलेल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, त्र्यंबकेश्वर मंदिर येत्या १५ ऑक्टोबर २०२६ किंवा १६ ऑक्टोबर २०२६ पासून बंद राहण्याची शक्यता नाही. लवकरच मंदिर प्रशासनाकडून आणि राज्य शासनाकडून अंतिम तारीख जाहीर होण्याची शक्यता आहे. येत्या ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी ध्वजारोहन करून नाशिक- त्र्यंबकेश्वरमधील कुंभमेळ्याला सुरूवात होणार आहे. त्या अनुषंगाने आता मंदिर प्रशासनाकडून हालचालींना वेग आला आहे.

### महाराष्ट्रातून मान्सूनची माघार

नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी आज, ८ ऑक्टोबर २०२६ रोजी, महाराष्ट्राच्या उर्वरित भागातून माघार घेतली आहे. यासोबतच गोवा, कर्नाटक, तेलंगणा आणि ओडिशाच्या काही भागांतूनही मान्सून परतला आहे. झारखंड आणि छत्तीसगडच्या आणखी काही भागांतून मान्सूनची माघार झाली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सूनच्या परतीची रेषा आता सुपौल, रांची, सुंदरगड, बरगड, बिजापूर, हैदराबाद, बेळगावी आणि पणजी या भागांपर्यंत पोहोचली आहे.

पुढील ३ ते ४ दिवसांत मान्सूनची आणखी माघार-नैऋत्य मान्सूनच्या माघारीसाठी सध्या अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. पुढील ३ ते ४ दिवसांत पूर्व भारतातील आणखी काही भाग, उत्तर द्वीपकल्प आणि ईशान्य भारतातील अनेक भागांतून मान्सून माघारी जाण्याची शक्यता आहे. यामुळे देशातील हवामान हळूहळू मान्सूनोत्तर ऋतूकडे वाटचाल करत आहे. मात्र, मान्सून परतत असला तरी काही भागांत पावसाची शक्यता कायम राहणार आहे.

### दुष्काळ जाहीर झालेल्या २६५ तालुक्यांसाठी रेशन वितरणाचे निकष जाहीर

**मुंबई :** दुष्काळ जाहीर झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये आता अन्नधान्याच्या उपलब्धतेवर सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. दुष्काळामुळे रोजगारासाठी गाव सोडणाऱ्या शेतमजुरांसह अन्य नागरिकांना रेशनपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी राज्यातील कोणत्याही रास्त भाव दुकानातून धान्य उचलण्याची सुविधा काटेकोरपणे लागू करण्याचे निर्देश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने गुरुवारी दिले. 'वन नेशन वन रेशन कार्ड'अंतर्गत ही पोर्टेबिलिटी लागू करण्यात येणार असून, नव्याने मोफत धान्याची मागणी करणाऱ्यांनाही पात्रतेनुसार तातडीने रेशन योजनेत समाविष्ट केले जाणार आहे.

जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत झालेल्या पावसाच्या तुटीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने २५ सप्टेंबर रोजी २६५ तालुक्यांमध्ये 'ट्रिगर-१'अंतर्गत दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली. या भागात शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण कुटुंबांवर अन्नधान्याच्या उपलब्धतेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने वितरण यंत्रणेला विशेष सूचना दिल्या आहेत.

## दुष्काळ, पाऊस, पीक नुकसान, पिण्याचे पाणी, जनावरांच्या चाऱ्याबाबत राज्य शासनाकडून केंद्रीय पथकाकडे सविस्तर सादरीकरण

### केंद्रीय पथकाकडून महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी दौरा सुरु

मुंबई (समर्थ गांवकरी)

खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. ११ ऑक्टोबरपर्यंतच्या या दौऱ्यात राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार असून, पाऊस, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याच्या स्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे.

केंद्राच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल हे या पथकाचे प्रमुख आहेत. केंद्र शासनाच्या कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग आणि अन्य संबंधित विभागांतील प्रशासकीय आणि तांत्रिक अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे.

राज्य शासनाकडून दुष्काळी स्थितीचे सविस्तर सादरीकरण

केंद्रीय पथकाच्या मुंबईतील आगमनानंतर सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी यावेळी पावसाच्या कमतरतेमुळे महाराष्ट्रातील काही भागांत निर्माण झालेली पाणीटंचाई, टँकर्सची संभाव्य गरज, शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर व जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांची स्थलांतराची शक्यता आणि शेतकरी आत्महत्या या बाबींकडे केंद्रीय पथकाचे लक्ष वेधले.

राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने अपर मुख्य सचिव विनिता वेद-सिंगल यांनी राज्यातील पावसाची स्थिती, अल निनोमुळे हवामान आणि पावसावर झालेले परिणाम तसेच शेतीपिकांच्या नुकसानीची सविस्तर आणि तांत्रिक माहिती दिली. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतही सविस्तर आढावा

**■ ११ ऑक्टोबरपर्यंत केंद्रीय पथकाचा महाराष्ट्र दौरा**

सादर करण्यात आला.

कृषी विभागाच्या वतीने सचिव परिमल सिंह आणि आयुक्त सूरज मांढरे यांनी राज्यातील पिकांच्या नुकसानीची आणि जिल्हानिहाय परिस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती केंद्रीय पथकासमोर मांडली. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती तसेच आगामी सात महिन्यांसाठीच्या संभाव्य परिस्थितीची माहिती दिली.

#### पिण्याच्या पाण्याच्या स्थितीचा आढावा

राज्यातील पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. सध्या टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा, मागील तीन वर्षांच्या तुलनेतील पाण्याची स्थिती आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या गावांची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन तसेच भूजल सर्वेक्षण व विकास आयुक्त रवींद्र खेबुडकर यांनी सादर केली. जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, रोजगार हमी योजनेचे सचिव अप्पासाहेब धुळाज यांच्यासह ऊर्जा विभागाच्या वतीने सद्यस्थितीचा आढावा सादर करुन आगामी सात महिन्यातील संभाव्य परिस्थितीची माहिती दिली. यावेळी लघुपाटबंधारे तलाव (एम आय टँक), गावांमधील पाण्याचे स्रोत आणि त्यांची सद्यस्थिती याबाबतही केंद्रीय पथकाला माहिती देण्यात आली.

#### प्रत्यक्ष पाहणीसाठी जिल्हे आणि ठिकाणे निश्चित

राज्य शासनाने सादर केलेली आकडेवारी, उपलब्ध पुरावे आणि विविध विभागांकडून मिळालेल्या माहितीची केंद्रीय पथकाने दखल घेतली. या माहितीच्या आधारे दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी



करण्यासाठी कोणत्या जिल्ह्यांना आणि ठिकाणांना भेटी द्यायच्या, याबाबत नियोजन करण्यात आले.

केंद्रीय पथकातील अधिकारी राज्यातील विविध भागांत जाऊन दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. यासाठी विविध पथके तयार करुन जास्तीत जास्त क्षेत्राचा आढावा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या पाहणीदरम्यान स्थानिक अधिकारी, तज्ज्ञ आणि राज्य शासनाचे संबंधित अधिकारीही उपस्थित राहणार आहेत.

प्रत्यक्ष पाहणी पूर्ण केल्यानंतर केंद्रीय पथक मुंबईत परतणार असून ११ ऑक्टोबर रोजी दुष्काळी परिस्थितीबाबत पुढील सविस्तर चर्चा करणार आहे. या दौऱ्याच्या माध्यमातून राज्यातील दुष्काळाची वस्तुस्थिती, शेतीपिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि आवश्यक उपाययोजनांची माहिती केंद्र सरकारसमोर मांडली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ग्राम विकास विभागाचे सचिव डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज यांच्यासह केंद्रीय पथकातील सदस्य आणि राज्यातील संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# भारतीय टपाल : विश्वासाचे नेटवर्क

## जागतिक पोस्ट दिन विशेष

**एकेकाळी एखादे पत्र घराच्या उंबरठ्यावर आले की त्यात दूरच्या माणसाचा आवाज, आपुलकीची ऊब आणि आठवणींचा सुगंध असायचा. आज मोबाईलच्या पडद्यावर संदेश क्षणात पोहोचतो; तरीही टपाल सेवेचे महत्त्व संपलेले नाही. कारण टपाल म्हणजे केवळ पत्रांची ने-आण नव्हे, तर माणसे, व्यवसाय, सेवा आणि संधी यांना जोडणारे विश्वासाचे जाळे आहे. याच व्यापक भूमिकेची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी ९ ऑक्टोबर रोजी जागतिक पोस्ट दिन साजरा केला जातो. २०२६ ची थीम "One Postal Network, Infinite Possibilities' अर्थात 'एक टपाल नेटवर्क, अनंत शक्यता' अशी आहे.**

९ ऑक्टोबर १८७४ रोजी स्वित्झर्लंडमधील बर्न येथे जनरल पोस्टल युनियनची स्थापना झाली. पुढे १८७८ मध्ये या संघटनचे नाव युनिव्हर्सल पोस्टल युनियन असे करण्यात आले. विविध देशांच्या टपाल व्यवस्थांना समान व्यासपीठ मिळाल्याने आंतरराष्ट्रीय पत्रव्यवहार अधिक सुलभ झाला. १९६९ मध्ये टोकियो येथे झालेल्या युनिव्हर्सल पोस्टल काँग्रेसमध्ये ९ ऑक्टोबर हा जागतिक पोस्ट दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय झाला. आज हा दिवस टपाल सेवेमुळे समाजजीवन आणि अर्थव्यवस्थेला मिळालेल्या योगदानाची जाणीव करून देतो.

भारताच्या टपाल व्यवस्थेचा इतिहासही समृद्ध आहे. देशात टपाल व्यवस्था यापूर्वीपासून अस्तित्वात असली, तरी १८५४ हे आधुनिक भारतीय टपाल व्यवस्थेच्या विकासातील महत्त्वाचे वर्ष ठरले. त्यापूर्वी १८५२ मध्ये सिंध प्रांतात 'सिंध डाक' हे टपाल तिकीट जारी झाले होते. १९११ मध्ये अलाहाबाद ते नैनीदरम्यान जगातील पहिले अधिकृत विमान टपाल उड्डाण झाले. पत्रांच्या देवाणघेवाणीपासून सुरू झालेला हा प्रवास पुढे अनेक प्रकारच्या लोकसेवांपर्यंत पोहोचला. काळानुसार बदल स्वीकारणे ही भारतीय टपाल व्यवस्थेची मोठी जमेची बाजू ठरली आहे. आज भारतीय टपालाचे जाळे देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेले आहे. विशेषतः ग्रामीण भागासाठी पोस्ट ऑफिसचे महत्त्व वेगळे आहे. गावातील छोट्या पोस्ट ऑफिसमध्ये पत्रे, पार्सल आणि आर्थिक व्यवहारांसोबत नागरिकांच्या अनेक गरजांची पूर्तता होते. शहरांपासून दूर असलेल्या भागांतही ही सेवा सुरू असते. अनेकांसाठी पोस्ट ऑफिस हे अजूनही जवळचे आणि विश्वासाचे केंद्र आहे.

देशाचा भौगोलिक विस्तार पाहिला तर टपाल कर्मचाऱ्यांसमोरील आव्हाने लक्षात येतात. हिमालयातील दुर्गम भाग असो, काश्मीरमधील दल सरोवर असो किंवा हिमाचल प्रदेशातील हिक्किम सारखे उंचावरील ठिकाण असो, टपालाने आपली वाट शोधली आहे. पाऊस, बर्फ, डोंगरवाटा आणि लांबचे अंतर यांची पर्वा न करता सेवा सुरू ठेवावी लागते. पोस्टमनच्या कामातील ही चिकाटी टपाल व्यवस्थेची खरी ताकद सांगून जाते. काळ बदलला तसे टपालाच्या कामातही मोठा बदल झाला. एकेकाळी पत्र, पोस्टकार्ड, मनीऑर्डर आणि तार ही प्रमुख साधने होती. आता स्पीड पोस्ट, पार्सल, ई-कॉमर्स वितरण, ट्रॅकिंग, विमा, बचत योजना आणि डिजिटल बँकिंग यामुळे पोस्ट ऑफिसच्या सेवांचा विस्तार झाला आहे. घरबसल्या वस्तू मागवण्याची सवय वाढल्याने पार्सल वितरणाचे महत्त्वही वाढले. डिजिटल संवादाच्या युगात टपालाचे काम कमी झाले नाही; त्याने आपले स्वरूप बदलले आहे.

सामान्य माणसाच्या आर्थिक जीवनातही पोस्ट ऑफिसची भूमिका महत्त्वाची आहे. बचत खाते, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी, सुकन्या समृद्धी योजना आणि राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र यांसारख्या योजनांमधून नागरिकांना बचतीचे पर्याय उपलब्ध होतात. विशेषतः ग्रामीण भागात सुरक्षित बचतीसाठी पोस्ट ऑफिसवर अनेक वर्षांपासून विश्वास ठेवला जातो. बचत, सरकारी योजना आणि आर्थिक व्यवहार यांच्याशी पोस्ट ऑफिसचे नाते आजही कायम आहे.

इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेमुळे या सेवांना नवे रूप मिळाले. बँकेपर्यंत जाणे कठीण असलेल्या नागरिकांना घरपोच बँकिंग आणि डिजिटल व्यवहाराच्या सुविधा मिळू लागल्या. पोस्टमन आता फक्त पत्र घेऊन येणारा कर्मचारी राहिलेला नाही. आर्थिक व्यवहार आणि डिजिटल सेवांसाठीही त्याच्यावर नागरिकांचा विश्वास वाढला आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने पोस्टमनची भूमिका नव्या काळाशी जोडली जात आहे.

टपाल व्यवस्थेतील बदलाचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'डिजिपिन'. पत्ता शोधणे आणि वितरण अधिक अचूक करणे हा त्यामागचा उद्देश आहे. पारंपरिक पत्त्याबरोबर तंत्रज्ञानाची जोड देणारी ही डिजिटल पत्ता प्रणाली भविष्यात पार्सल सेवा, आपत्कालीन मदत आणि इतर सार्वजनिक सेवांसाठी उपयुक्त ठरू शकते. भारतासारख्या मोठ्या आणि विविध भौगोलिक रचनेच्या देशात अशा सुविधांचे महत्त्व वाढणार आहे. टपाल सेवेला सामाजिक जबाबदारीचीही मोठी किनार आहे. सरकारी कागदपत्रे, आर्थिक मदत, विविध योजनांशी संबंधित माहिती आणि नागरिकांच्या गरजेच्या वस्तू पोहोचवताना टपाल कर्मचारी अनेकदा शेवटच्या टप्प्यावर काम करतो. संकटाच्या परिस्थितीतही सेवा सुरू ठेवण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असते. कार्यालयातील कर्मचारी आणि रस्त्यावर फिरणारा पोस्टमन यांच्या मेहनतीमुळे या व्यवस्थेवरील विश्वास टिकून आहे.

गावच्या रस्त्यावरून सायकलवरून जाणारा पोस्टमन हातातील पत्रे किंवा पार्सल घेऊन घराच्या दारात उभा राहतो, तेव्हा त्याच्यासोबत केवळ एक वस्तू येत नसते. कोणाची तरी बातमी, कागदपत्र किंवा अपेक्षा आलेली असते. आज पत्रांची संख्या पूर्वीसारखी नसली, तरी टपाल कर्मचाऱ्याच्या कामाची गरज वेगळ्या स्वरूपात कायम आहे.

जागतिक पोस्ट दिनाच्या निमित्ताने टपाल व्यवस्थेकडे जुन्या पत्रांच्या आठवणी म्हणून पाहत असताना ई-कॉमर्स, डिजिटल व्यवहार, आधुनिक लॉजिस्टिक्स आणि नव्या तंत्रज्ञानामुळे या क्षेत्रासमोर मोठ्या संधी उभ्या दिसतात. कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित वर्गीकरण आणि डिजिटल पत्त्यांसारख्या सुविधा भविष्यात सेवा अधिक वेगवान करू शकतात. मात्र तंत्रज्ञान कितीही पुढे गेले, तरी नागरिकांचा विश्वास हीच कोणत्याही सार्वजनिक सेवेची खरी ताकद राहणार आहे.

पत्रांचा काळ मागे पडला असला, तरी टपालाचा प्रवास थांबलेला नाही. माध्यम बदलले, गरजा बदलल्या आणि सेवा बदलत आहेत. या बदलांसोबत टपालही पुढे जात आहे. म्हणूनच आजचा पोस्ट दिन हा टपाल सेवेप्रती विश्वास टिकवत भविष्याकडे पाहण्याचा दिवस आहे. एक मजबूत नेटवर्क, बदलत्या काळाशी जुळवून घेणारी सेवा आणि नागरिकांच्या विश्वासाची भक्कम शिदोरी हीच भारतीय टपालाची खरी ओळख आहे.

# सामाजिक बांधिलकी जोपासणारा सिनेविश्वातील क्रांतिवीर हरपला : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर हे आदर्श नटसम्राट कलावंत होते.त्यांच्या निधनाने सामाजिक बांधिलकी जोपासणारे सिनेविश्वातील क्रांतिवीर व्यक्तिमत्व हरपले आहे अशा शब्दांत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी दिवंगत नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने महाराष्ट्राचे आणि संपूर्ण देशाचे कलाक्षेत्रातील सामाजिक क्षेत्रातील कधीही भरून येणार नाही असे नुकसान झाले आहे.

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी हिंदी आणि मराठी सिने क्षेत्र आपल्या अभिनयाने समृद्ध केले.त्यांनी सिनेमांत साकारलेल्या विविध व्यक्तिरेखा संस्मरणीय झालेल्या आहेत.कलाकार म्हणून त्यांचे व्यक्तिमत्व संपूर्ण देशात प्रत्येकाच्या हृदयात अमीट अजरामर झालेले आहे. प्रहार ; परिंदा; क्रांतिवीर नटसम्राट असे अनेक चित्रपट त्यांच्या अभिनयाने गाजले आणि सजले आहेत.त्यांना अभिनय क्षेत्रात अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. पद्मश्री किताबाने भारत सरकारने त्यांच्या अभिनय कलेचा बहुमान केला आहे. सिनेमांत दाखविण्यात येणारे आदर्श क्रांतिकारी सामाजिक व्यक्तिमत्व नाना पाटेकर यांनी पडद्या बाहेर आणून समाजात प्रत्यक्ष जीवनात आदर्श वाटावेत अशी सामाजिक कामे केली.त्यात त्यांनी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी केलेले काम अतुलनीय आहे.सामाजिक बांधिलकीतून त्यांनी नाम फाऊंडेशन द्वारे केलेले काम आदर्श आहे.

वैचारिक बैठक मजबूत असणारे नाना पाटेकर यांचे व्यक्तिमत्व स्वतंत्र आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारे होते.त्यांचा आवाज त्यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांचा अभिनय भारतीय सिने सृष्टीचे वैभव ठरले असून नाना पाटेकर सदैव संस्मरणीय राहतील अशी शिकभावना ना. रामदास आठवले यांनी पाठवलेल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे.




# डिंभे-माणिकडोह बोगदा होऊ देणार नाही

## देवदत्त निकम यांची जलसंपदा मंत्र्यांसमोर रोखठोक भूमिका

**मंचर (समर्थ गांवकरी)**

डिंभे-माणिकडोह बोगद्याला आंबेगाव, शिरूर आणि जुन्नर तालुक्यांतील जनतेचा ठाम विरोध असून हा बोगदा होऊ देणार नाही, अशी रोखठोक भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासमोर मांडली.निकम यांनी बुधवार दि.७ रोजी विखे पाटील यांची भेट घेऊन आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित सिंचन योजनांबाबत चर्चा केली.

पारनेर येथे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देतेवेळी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष धोंडीभाऊ भोर, माऊली ढोमे, युवक तालुकाध्यक्ष विशाल वाबळे, संजय बढेकर,संजय खांडगे, भिकाजी जाधव पाटील,तेजस जाधव, सनी घावटे आदी उपस्थित होते.हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे-माणिकडोह बोगदा रद्द करावा, आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील उपसा सिंचन योजनांना मंजुरी देऊन चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेत समावेश करावा, तसेच आदिवासी भागासाठी राखीव सहा टक्के पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली. सातगाव पठाराला कळमोडी धरणातून उपसा सिंचनाद्वारे पाणी द्यावे; ते शक्य नसल्यास डिंभे धरणातील अतिरिक्त पाणी उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी करण्यात आली.पहाडदरा, लोणी व धामणी परिसरासाठी म्हाळसाकांत योजनेचा चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेत समावेश, डिंभे धरणाच्या डाव्या कालव्याची दुरुस्ती, माणिकडोह धरणाच्या पश्चिमेकडील वाहून जाणारे पाणी अडवून साठ्यात वळविणे आणि थिटेवाडी धरणात पाणी सोडण्याची मागणीही निकम यांनी केली.



# पत्रकारांना एक लाख रुपयांचे अपघाती विमा कवच; अभिनव उपक्रम

## सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप दळवी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या उपक्रमाचे कौतुक

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांना वृत्तांकनासाठी ऊन, वारा, पाऊस यांची पर्वा न करता कर्तव्य बजावावे लागते. बहुतांश पत्रकारांचा प्रवास दुचाकीवरून होत असल्याने प्रवासादरम्यान अपघाताची शक्यता असते. अशा वेळी उपचारांचा मोठा खर्च तसेच कुटुंबाची होणारी धावपळ लक्षात घेता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने तालुक्यातील पत्रकारांना देण्यात आलेले अपघाती विमा कवच हा निश्चितच अभिनव उपक्रम आहे, असे गौरवोद्गार कोपरगाव पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप दळवी यांनी काढले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे व जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष सोमनाथ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली, कोपरगाव तालुकाध्यक्ष प्रा. विजय कापसे यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील ५० हून अधिक पत्रकारांचा प्रत्येकी एक लाख रुपयांचा अपघाती विमा काढण्यात आला आहे. या विमा संरक्षणासह संघटनेच्या ओळखपत्रांचे वाटप नुकतेच जिल्हा उपाध्यक्ष जनार्दन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली तसेच गोदामाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष आदिनाथ ढाकणे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले यावेळी दळवी बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष प्रा. विजय कापसे यांनी केले. त्यांनी संघटनेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची तसेच संघटनेच्या कार्यविस्ताराची माहिती दिली. आदिनाथ ढाकणे यांनी संघटनेच्या उपक्रमांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष जनार्दन जगताप यांनी संघटनेची माहिती देत ओळखपत्राचे महत्त्व व फायदे स्पष्ट केले.



> पत्रकारांच्या अपघाती विम्याची संकल्पना खरोखरच अभिनव असून यातून जर कधी काही विपरीत घटना घडली तर कुटूंबाला मदत मिळू शकते त्यामुळे या उपक्रमासाठी कोपरगाव तालुका पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करतो,
>
> **- डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ प्रदेश सरचिटणीस**

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका सचिव विनोद देवरे यांनी केले, तर आभार प्रमोद पवार यांनी मानले. यावेळी शहराध्यक्ष हफिज शेख, कचरू लोहकरे, संजय लाड, रहीम पठाण, विशाल लोंढे, मिलिंद विघे, महेश गायकवाड, योगेश रुईकर, अनिल दीक्षित, सुनील ससाणे, योगेश डोखे, सोमनाथ डफळ, रवी वाघडकर, राजेंद्र तासकर, सतीश जाधव, अक्षय काळे, अमोल गायकवाड, शहाबाज कुरेशी आदी तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते.

# धनादेश न वटल्या प्रकरणी साई आदर्श मल्टिस्टेटच्या कर्जदारास शिक्षा

**राहूरी (समर्थ गांवकरी)**

राहुरी येथील साई आदर्श मल्टीस्टेट संस्थेच्या शाखेतून वरवंडी, तालुका राहुरी येथील फिरोज रशिद शेख यांनी ७५ हजार रुपये कर्ज घेतले होते. सदर कर्जाची परतफेड ठरल्याप्रमाणे वेळेत केली नाही थकबाकी झाली तेव्हा संस्थेचे कर्मचारी वसुलीसाठी गेले असता कर्जदाराच्यावतीने वडील या नात्याने रशीद उस्मान शेख यांनी स्वतःच्या खात्यातील भारतीय स्टेट बँक शाखा अहमदनगरचा धनादेश क्रमांक २५ ५७ ८७ रक्कम रुपये १०३०००/- (एक लाख तीन हजार) चा धनादेश देऊन वटण्याची हमी व भरोसा दिला व कर्जापोटी रक्कम घेऊन जाण्यास सांगितले. परंतु सदरचा धनादेश वटला नाही म्हणून फिर्यादी साई आदर्श संस्थेच्या वतीने अहिल्यानगर येथील न्यायालयात नि.इ. ॲक्ट १३८ नुसार फौजदारी दाखल केली. सदरची फिर्याद मे.न्यायालयात गुणदोषावर सुनावणी झाली सदर सुनावणीचे वेळी साई आदर्श संस्थेच्या वतीने किरण रसाळ यांची साक्ष नोंदवण्यात आली व त्यावेळी साई आदर्श संस्थेच्या वतीने आवश्यक ती योग्य कागदपत्रे न्यायालयात दाखल करण्यात आली. फिर्यादी संस्थेचे रसाळ यांची साक्ष दाखल केलेली कागदपत्रे व आलेला पुरावा ग्राह्य धरून आरोपी रशीद उस्मान शेख यास रुपये १३००००/- (एक लाख तीस हजार) नुकसान भरपाई व ती न भरल्यास दोन महिने शिक्षा असा आदेश केलेला आहे.

# दुष्काळी परिस्थितीची केंद्राकडून पाहणी

## शुक्रवारी पथक अहिल्यानगर जिल्ह्यात

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

**विविध भागांना प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी; केंद्र शासनाला सादर होणार सविस्तर अहवाल**

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश्य परिस्थितीची केंद्र शासनाकडून गांभीर्याने दखल घेण्यात आली असून, दुष्काळाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र शासनाचे पथक शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहे. पथकाकडून जिल्ह्यातील विविध भागांना प्रत्यक्ष भेटी देऊन दुष्काळी परिस्थिती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, शेतीवरील परिणाम तसेच आवश्यक उपाययोजनांची पाहणी करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीची वस्तुस्थिती केंद्र शासनाच्या पथकाला प्रत्यक्ष पाहता यावी, यासाठी संबंधित यंत्रणांकडून आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पथकाकडून विविध ठिकाणी भेटी देऊन स्थानिक परिस्थितीची पाहणी तसेच संबंधित अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून परिस्थितीची माहिती जाणून घेतली जाणार आहे. टंचाईग्रस्त गावांमध्ये पाणीपुरवठ्याचे नियोजन, टँकरद्वारे पाणीपुरवठा, उपलब्ध जलस्रोतांची स्थिती आदी बाबींचीही पाहणी होणार आहे. त्याचबरोबर पावसाअभावी शेतीपिकांवर झालेला परिणाम, पीक नुकसानीचे पंचनामे, चारा उपलब्धता आणि पशुधनासाठी आवश्यक उपाययोजना याबाबतची वस्तुस्थितीही पथकाच्या निदर्शनास आणून दिली जाणार आहे.

केंद्र शासनाचे पथक जिल्ह्यातील प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून त्याचा सविस्तर अहवाल केंद्र शासनाला सादर करणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, त्याची तीव्रता आणि आवश्यक मदतीबाबतची वस्तुनिष्ठ माहिती केंद्र शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा यांचे कार्यालय.**

पत्ता- पेडगाव रोड, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर, पिन- ४१३७०१

ई-मेल - kid2_shrigonda@yahoo.co.in दूरध्वनी क्र. - ०२४८७-२२२३५१

निविदा सूचना क्र. ०७ सन २०२६-२०२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सूचना विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत (लक्ष) | इसारा/ बयाना रक्कम (रु.) | निविदा फी (रु.) | ठेकेदाराचा वर्ग | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साकळाई उपसा सिंचन योजना, चिखली, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर या योजनेसाठी वन्यजीव मान्यता घेणे व आनुषंगिक कामे करणे | ३५.४१ | ३५५००/- | २३६०/- | Empanelled By MKVDC, Pune | ९ महिने |

**निविदा उपलब्ध कालावधी -** दिनांक ०९/१०/२०२६ ते दिनांक १६/१०/२०२६

**निविदा उघडण्याचा दिनांक -** १९/१०/२०२६

जा.क्र.कुपावि-२/लेशा-२/निविदा/ ४९९३ / सन २०२६

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयकुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा.

दिनांक : ०८/१०/२०२६

**जिमाका/नगर/जाहि/ १४१/२०२६**

**(प्रविण व घोरपडे)**
**कार्यकारी अभियंता,**
कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २,
श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर

**भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संगमनेर भागर संगमनेर यांचे कार्यालय,**

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ खालील अधिसुचना.

**अधिसुचना**

भुसंपादन क्रमांक - एलएक्यू/एसआर/कुंभेफळ/०७/२०२५.

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अहिल्यानगर जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन अधिसूचना क्रमांक नाशिक विभागीय पुरवणी गुरुवार ते बुधवार १८-२४, जुन २०२६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, अहिल्यानगर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे; आणि म्हणुन, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निरंक निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये निरंक विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमांच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, संगमनेर भाग संगमनेर यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची -एक** **संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

गाव - कुंभेफळ, तालुका- अकोले, जिल्हा- अहिल्यानगर

| अ.क्र. | भूमापन किंवा गट नंबर | आवश्यक जमीनीचे अदमासे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | ३२/४ पैकी | ०.३७ |
| एकुण | - | ०.३७ |

**अनुसूची -दोन** सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :- उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) डावा कालवा कि.मी. २२ करिता मौजे. कुंभेफळ, ता. अकोले, जिल्हा अहिल्यानगर येथील जमिनीचे भूसंपादन.

प्रकल्प कामाचे वर्णन :- उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) डावा कालवा कि.मी. २२ करिता मौजे. कुंभेफळ, ता. अकोले, जिल्हा अहिल्यानगर येथील एकुण ०.३७ (हे. आर) जमीन संपादित करणे.

समाजाला मिळणारे लाभ :- उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे-२) डावा कालवा अंतर्गत येणाऱ्या गावातील जमिनींना व पिण्यासाठी पाणीपुरवठा (आर्थिक, रोजगार, पायाभुत सुविधा, सोयीसुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात).

**अनुसूची -तीन -** पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन - गावाचे नांव - कुंभेफळ, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

**अनुक्रमांक** **भूमापन क्रमांक किंवा गट नंबर** **अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये) ------- निरंक**

**अनुसूची-चार -** (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश) - लागु नाही-

टिप - उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी, संगमनेर भाग संगमनेर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :-

ठिकाण:- संगमनेर

**जिमाका / नगर/ जाहि/ १३७/२०२६**

**(अरुण उंडे)**
**उपविभागीय अधिकारी**
**संगमनेर भाग संगमनेर**

# जलजीवन मिशनच्या कामांत अनियमितता?

# ठेकेदारांसह ग्रामसेवकांची चौकशी करण्याचे मंत्री विखे पाटील यांचे आदेश!

पारनेर (समर्थ गांवकरी)

**जिल्ह्यात जलजीवन मिशनची कामे कंत्राट घेतलेल्या ठेकेदारांनी स्वतः न करता अन्य ठेकेदारांकडून करून घेतल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित ठेकेदारांसह त्याला संमती देणाऱ्या ग्रामसेवकांची चौकशी करण्याचे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना दिले. टंचाई परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पारनेर येथे झालेल्या आढावा बैठकीत पाणीटंचाई, चारा टंचाई आणि वीज समस्यांचा आढावा घेण्यात आला. ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारींची गंभीर दखल घेऊन संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. यावेळी आमदार काशिनाथ दाते, अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, राहुल शिंदे, सुजित झावरे, अशोकराव सावंत यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि शेतकरी उपस्थित होते.**

बैठकीत जलजीवन मिशनच्या कामांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी करण्यात आल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, मात्र काही ठिकाणी या योजना ठेकेदारांच्या मनमानीमुळे अडचणीत आल्याची खंत मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली. कंत्राट घेऊनही कामे न करणाऱ्या ठेकेदारांनी ती अन्य ठेकेदारांना कशी दिली आणि त्याला ग्रामसेवकांनी संमती कशी दिली, याची चौकशी करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

अनेक ठिकाणी ग्रामस्थांना विश्वासात न घेता मनमानी पद्धतीने पाइप टाकण्यात आल्याने शासनाचा निधी वाया गेल्याची तक्रारही बैठकीत करण्यात आली. दरम्यान, टंचाईच्या काळात गावांना टँकरद्वारे स्वच्छ व शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाण्याचा उद्भव असलेल्या ठिकाणी फिल्टर बसविण्याचा राज्यातील पहिला प्रयोग जिल्ह्यात सुरू असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. चारा टंचाईबाबत पशुसंवर्धन विभागाने नव्याने माहिती संकलित करून चारा उत्पादन करणारे शेतकरी, पशुधन असलेले







मात्र चारा उपलब्ध नसलेले शेतकरी यांचा स्वतंत्र तपशील तयार करून नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तालुक्यातील वीज समस्यांसाठी एक दिवस विशेष बैठक घेऊन सर्व तक्रारींचे निराकरण करावे, असे निर्देशही मंत्री विखे पाटील यांनी दिले. छोट्या समस्यांमुळे गावपातळीवर अधिकाऱ्यांविरोधात रोष निर्माण होतो आणि त्यातून विनाकारण शासनाची बदनामी होते, असे त्यांनी नमूद केले. टंचाई परिस्थितीशी संबंधित आवश्यक निधीचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत आणि निधीअभावी कोणतेही काम रखडवू नये, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. कुकडी कालव्याच्या कामासाठी ४४९ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले असून चार उपसा सिंचन योजनांचे सर्वेक्षण पूर्ण होत आहे.

पुणेवाडी, राळेगणसह अन्य योजनांचा आराखडा तयार झाला असून निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. पारनेर दुष्काळमुक्त करण्याचे खासदारांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. आमदार काशिनाथ दाते यांनीही दुष्काळी परिस्थितीतील विविध प्रश्न मांडून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### कळंबमध्ये शेती पंपाच्या सिंगल फेज मोटारींचे किट काढू नका

#### ग्रामस्थांचे महावितरणला निवेदन



मंचर (समर्थ गांवकरी)

शेती पंपाला लावलेले सिंगल फेज मोटारींचे किट काढू नयेत तसेच शेतकऱ्यांवर कारवाई करू नये, अशी मागणी कळंब (ता.आंबेगाव) येथील ग्रामस्थांच्या वतीने महावितरणकडे करण्यात आली. याबाबत कळंब येथील महावितरणचे सहाय्यक अभियंता निखिल तिवारी यांना बुधवार दि.७ रोजी निवेदन देण्यात आले. महावितरणकडून सिंगल फेज मोटारींचे किट दोन दिवसांत काढून घेण्याचा संदेश शेतकऱ्यांना देण्यात आला होता.या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी निवेदन देत सध्या दुष्काळजन्य परिस्थिती असून पाण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.तसेच कळंब परिसर बिबट्यांच्या वावरामुळे संवेदनशील असल्याने रात्रीच्या वेळी शेतकऱ्यांना शेतात जाऊन पिकांना पाणी देणे धोकादायक ठरत आहे.त्यामुळे सिंगल फेज मोटारींचे किट सुरू ठेवण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.यावेळी शिवसेना उबाठा पक्षाचे तालुकाप्रमुख नितीन भालेराव, उपसरपंच कमलेश वर्पे,ग्रामपंचायत सदस्य दत्ता कानडे, तंटामुक्ती अध्यक्ष महेश भालेराव, शिवसेना समन्वयक रोहन कानडे,उपशाखाप्रमुख कुमार भोक्से, प्रमोद पिंगळे, संतोष भालेराव, मुकुंद भालेराव, राजेंद्र भालेराव, विठ्ठल भालेराव, रमेश थोरात, सुनील पाटील, विकास चिखले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.कळंब येथील महावितरणचे सहाय्यक अभियंता निखिल तिवारी म्हणाले शेतीपंपांसाठी महावितरणकडून दररोज आठ तास थ्री फेज वीजपुरवठा केला जातो.त्यानंतर सिंगल फेज वीजपुरवठा सुरू होतो.या कालावधीत काही शेतकरी स्वतःच्या शेतीपंपाला सिंगल फेज किट बसवून थ्री फेज वीजपुरवठा सुरू ठेवत असल्याचे निदर्शनास आले आहे.शेतीपंपांना अशा प्रकारे सिंगल फेज किट बसविण्यास महावितरणची मान्यता नाही.सिंगल फेज वीजपुरवठ्याच्या वेळी किट बसविल्यामुळे विजेचा वापर वाढतो.त्यामुळे महावितरणच्या रोहीत्राचे आर्थिक नुकसान होत आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार शेतकऱ्यांनी आपल्या शेतीपंपांना बसविलेले सिंगल फेज किट स्वतःहून काढून घ्यावेत.अन्यथा महावितरणच्या पथकाकडून तपासणी करून संबंधित किट जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल,असा इशारा देण्यात आला.

### नाना पाटेकर यांच्या निधनाने कला क्षेत्राची मोठी हानी : साईराम महाराज रहाणे

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. आपल्या दमदार अभिनयाने, प्रभावी संवादफेकीने आणि विविधांगी भूमिकांनी त्यांनी रसिकांच्या मनावर अनेक दशकांपासून अधिराज्य गाजवले. त्यांच्या निधनाने कला क्षेत्राची मोठी हानी झाली असल्याची भावना साईराम महाराज रहाणे यांनी व्यक्त केली. नाना पाटेकर हे केवळ उत्कृष्ट अभिनेते नव्हते, तर संवेदनशील मनाचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या अभिनयातील सहजता, सामाजिक जाणिवा आणि मराठी मातीशी असलेले नाते कायम स्मरणात राहील. त्यांनी साकारलेल्या असंख्य भूमिका रसिकांच्या मनात कायम जिवंत राहतील. नाना पाटेकर यांच्या जाण्याने चित्रपटसृष्टीतील एका मोठ्या पर्वाचा अंत झाला असून, त्यांच्या कुटुंबीय, आप्तेष्ट, सहकलाकार आणि चाहत्यांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचे सांगत साईराम महाराज रहाणे यांनी नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



## अवसरी बुद्रुकच्या वाघदरा पाझर तलावाला नाना पाटेकर यांचे नाव

अवसरी बुद्रुक (समर्थ गांवकरी)

**नाम फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या माध्यमातून अवसरी बुद्रुक ग्रामपंचायत परिसरात सुमारे दीड कोटी रुपयांची विविध विकासकामे करण्यात आली. यामध्ये ओढ्यांचे खोलीकरण तसेच पाझर तलावांचे खोलीकरण आदी कामांचा समावेश आहे. या कामांमुळे वाघदरा तलावाला नाना पाटेकर वाघदरा पाझर तलाव असे नाव देण्याचा निर्णय ग्रामस्थांनी गुरुवारी दुपारी घेतला आहे. नाम फाउंडेशन च्या वतीने झालेल्या कामामुळे परिसरातील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ होऊन ग्रामस्थांना मोठा फायदा झाला.**



नाना पाटेकर यांच्या सामाजिक कार्याची व अवसरी बुद्रुक गावासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची कृतज्ञतापूर्वक दखल घेत ग्रामपंचायत व समस्त ग्रामस्थांच्या वतीने वाघदरा पाझर तलावाचे 'नाना पाटेकर वाघदरा पाझर तलाव' असे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अवसरी बुद्रुक गावच्या प्रथम लोकनियुक्त सरपंच सारिका हिंगे, उपसरपंच अनिल पांडुरंग हिंगे, ग्रामपंचायत सदस्य प्रशांत वाडेकर, सदस्य कल्याण हिंगे, नामदेवशेठ चव्हाण, विकासशेठ हिंगे, गुलाब विठ्ठल चव्हाण, मच्छिंद्र टावरे, अजितशेठ वाडेकर, महेश फल्ले, दिलीप तनपुरे, नितीन शिंदे, दादाभाऊशेठ तावरे, ऋषी विलास तात्या हिंगे, शंकरराव अवसरीकर,भगीरथ जाधव, किसन बाबुराव हिंगे तसेच अवसरी बुद्रुकच्या सर्व ग्रामस्थांच्या वतीने नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## किरकोळ वादातून ५५ वर्षीय इसमाचा खून

### तोफखाना पोलिसांची २४ तासांत धडाकेबाज कामगिरी, दोन्ही आरोपी जेरबंद!

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

मोटारसायकलचा कट लागल्याच्या किरकोळ कारणावरून एका ५५ वर्षीय इसमावर धारदार हत्याराने वार करून खून केल्याची गंभीर घटना घडली. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत तपासाची चक्रे फिरवून मुख्य आरोपी सुरज रवी सोनवणे आणि प्रेम उर्फ सोनुल्या रवी सोनवणे या दोघांना अटक केली आहे.

मंधन रवींद्र चव्हाण यांचे वडील रवींद्र रामभाऊ चव्हाण (वय ५५, रा. सावेडी) हे बालीकाश्रम रोडवरील हॉटेलसमोरून जात असताना आरोपींच्या मोटारसायकलला त्यांच्या गाडीचा कट लागला. याच रागातून आरोपींनी चव्हाण यांच्यावर वार करून गंभीर जखमी केले, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला असून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबमे आणि नगर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली तोफखाना पोलिसांनी २४ तासांत आरोपींना जेरबंद केले. आरोपींना पोलीस ठाण्यात आणले असून, या घटनेमागील कारणाबाबत पोलीस कसून चौकशी करत आहेत.

## आंबेगाव तालुक्यातील घाऊक व किरकोळ किराणा व्यावसायिकांसाठी FoSTaC प्रशिक्षणाचे आयोजन

आंबेगाव (समर्थ गांवकरी)



आंबेगाव तालुक्यातील सर्व घाऊक व किरकोळ किराणा व्यावसायिकांसाठी अन्न सुरक्षा व मानके विभागाच्या मार्गदर्शनानुसार FoSTaC (Food Safety Training and Certification) प्रशिक्षण व प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम बुधवार दिनांक ७/१०/२०२६ रोजी एकलहरे येथील हॉटेल रविकिरण येथे संपन्न झाला.

अन्न सुरक्षा व मानके विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार किराणा व्यावसायिकांसाठी FoSTaC प्रमाणपत्र आवश्यक करण्यात आले असून, याबाबत व्यावसायिकांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणा वेळी ग्राम व औषध प्रशासन, महाराष्ट्र येथील निरीक्षक अमिजीत झोडगे तसेच FoSTaC-MCED चे राज्य समन्वयक संतोष चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन पुणे जिल्हा कंझ्युमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन, आंबेगाव तालुका किराणा भुसार असोसिएशन, आंबेगाव तालुका किराणा भुसार महासंघ, मंचर शहर किराणा असोसिएशन, आंबेगाव तालुका कंझ्युमर प्रॉडक्ट डिस्ट्रीब्युटर्स असोसिएशन आणि घोडेगाव किराणा महासंघ यांच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी आंबेगाव तालुक्यातील सर्व घाऊक व किरकोळ किराणा व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार निवड समितीवर डॉ. खेडलेकर यांची नियुक्ती

### संगमनेरमधून पद्मश्री रघुवीर खेडकर आणि खेडलेकर अशा दोघांची निवड

संगमनेर (समर्थ गांवकरी)



तमाशा क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार निवड समितीवर येथील लोककला अभ्यासक डॉ. संतोष खेडलेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने आज अध्यादेश जारी करून नवीन समितीची घोषणा केली आहे.

सन २००६ पासून महाराष्ट्र शासनाच्या वतीने तमाशा क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराला विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. सध्या या पुरस्काराचे स्वरूप दहा लाख रुपये, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे आहे. डॉ. खेडलेकर यांनी यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या तमाशासाठी देण्यात येणाऱ्या राज्य सांस्कृतिक पुरस्कार निवड समिती, महाराष्ट्र शासनाची तमाशा कलावंत तक्रार निवारण समितीवर काम केले आहे. याचबरोबर साहित्य क्षेत्रातील देशातील सर्वोच्च अशा साहित्य अकादमी पुरस्कार निवड समितीवरही काम केले आहे. ८ ऑक्टोबर रोजी काढलेल्या अध्यादेशानुसार राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार हे समितीचे अध्यक्ष तर समिती सदस्यांमध्ये डॉ. संतोष खेडलेकर यांच्यासह पद्मश्री रघुवीर खेडकर, ज्येष्ठ तमाशा कलावती आणि विठाबाई नारायणगावकर यांच्या ज्येष्ठ कन्या मंगला बनसोडे, आतांबर शिरढोणकर, गणेश चंदनशिवे, डॉ. श्यामल गरुड यांचा समावेश आहे.

डॉ. खेडलेकर यांच्या निवडीबद्दल राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, तमाशा परिषदेचे अध्यक्ष संभाजीराव जाधव, खान्देश तमाशा परिषदेचे अध्यक्ष शेषराव गोपाळ, अमृतवाहिनी बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी आदिंनी अभिनंदन केले आहे.

## महात्मा गांधींचे विचार, शास्त्रीजींची आदर्श मूल्ये अन् विद्यार्थ्यांचा गुणगौरव

### कोहोंडीत पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात!

राजूर (समर्थ गांवकरी)

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून वनसंस्कृती आदिवासी शेळीपालक शेतकरी गट, कोहोंडी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोहोंडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रश्नमंजुषा व पाठांतर स्पर्धा-२०२६ चा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. प्रारंभी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना गांधीजींचे सत्य, अहिंसा, स्वच्छता व स्वावलंबनाचे विचार तसेच शास्त्रीजींचा साधेपणा, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा व देशसेवेचा आदर्श याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन आवश्यक : डॉ. किरण लहामटे**

प्रश्नमंजुषा व पाठांतर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या मोठ्या गटात धनंजय निवृत्ती बांडे, धनुष बाळू तातळे, प्रथमेश ज्ञानेश्वर परते, मयूर हरिदास परते व पूजा निवृत्ती कचरे, तर लहान गटात वेदिका हौशीराम पिचड, गौरव सुनील देशमुख, ईश्वरी अशोक परते, अनन्या अशोक दिघे व आरती निवृत्ती कचरे यांनी यश संपादन केले. पाठांतर स्पर्धेच्या मोठ्या गटातून आरती राजू तातळे, हर्षद शशिकांत कोंडार, अंकिता नवनाथ भांगरे, प्रतीक संजय कचरे व राजश्री हिरामण परते, तर लहान गटातून शिरीष संतोष गवारी, साईश विठ्ठल तातळे, वैष्णवी जयराम परते, पल्लवी राजू तातळे व आर्या नवनाथ डगळे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र व पेन देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनाही बक्षिसे देऊन त्यांच्या सहभागाचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार डॉ. किरणजी लहामटे यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. मार्गदर्शन करताना डॉ. लहामटे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होणे, शाळा, शिक्षक व समाजाविषयी आदराची भावना निर्माण होणे आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी समाजाने सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. आदिवासी डोंगराळ भागातील छोट्याशा गावातील पशुपालकांनी एकत्र येऊन गट स्थापन करून जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धेचे आयोजन करणे हा तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील अभिनव उपक्रम असल्याचे त्यांनी कौतुकाने नमूद केले. तसेच शेळीपालनाचे व्यावहारिक महत्त्व सांगून गटाच्या माध्यमातून मिळणाऱ्या विविध लाभांची माहिती दिली व या नाविन्यपूर्ण उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.





यावेळी डॉ. जे. डी. भांगरे (पशुवैद्यकीय अधिकारी), आर. डी. सुपे (तालुका सहाय्यक कृषी अधिकारी), हिराबाई पांडुरंग तातळे (सरपंच, ग्राम पंचायत कोहोंडी) यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्याध्यापक कडाळी सर, डगळे सर, सौ. लोहकरे मॅडम, सौ. जाधव मॅडम व भांगरे सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर किरवे यांनी केले. प्रास्ताविक गटाचे सचिव संतोष परते यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत गटाचे अध्यक्ष हिरामण परते यांनी केले, तर आभार शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुधाकर किरवे यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### वडगाव काशिंबेग-नारोडी रस्ता झाडाझुडपांपासून मोकळा

मंचर (समर्थ गांवकरी)

आंबेगाव तालुक्यातील श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग ते चिंचोडी देशपांडे मार्गे नारोडी या रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झाडेझुडपे व गवत भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या सहकार्याने जेसीबीच्या साहाय्याने काढण्यात आले.त्यामुळे रस्ता वाहतुकीसाठी मोकळा व सुरक्षित झाला असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. मंचर येथून वडगाव काशिंबेग,चिंचोडी देशपांडे ते नारोडी अशी एसटी बससेवा सुरू आहे.तसेच शेतीमाल बाजारपेठेत नेण्यासाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. मात्र,रस्त्याच्या दुतर्फा झाडेझुडपे व मोठ्या प्रमाणात गवत वाढल्याने तसेच झाडांच्या फांद्या रस्त्यावर आल्याने वाहनांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी करण्यात आली होती.दरम्यान, माजी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील चिंचोडी देशपांडे येथे आले असता ग्रामस्थांनी ही समस्या त्यांच्या निदर्शनास



आणून दिली.त्यांनी भीमाशंकर सहकारी साखर कारखाना प्रशासनाशी संपर्क साधून रस्ता मोकळा करण्याची सूचना केली.म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनीही यासाठी पुढाकार घेतला. कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे-पाटील यांनी तातडीने जेसीबी उपलब्ध करून दिला. दोन दिवसांत झाडेझुडपे, गवत व इतर अडथळे दूर करण्यात आले.त्यामुळे एसटी बससह इतर वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.अशी माहिती आंबेगाव तालुका खरेदी विक्री संघांचे अध्यक्ष नवनाथ हुले आणि लांडेवाडीचे माजी उपसरपंच राजेंद्र शेवाळे यांनी दिली.रस्ता मोकळा झाल्यामुळे बिबट्यांचे किंवा इतर हिंस्त्र प्राण्याचे फारसे भय राहिले नाही.असे नारोडीच्या सरपंच मंगलताई हुले यांनी सांगितले.

### भाळवणी येथील महात्मा फुले विद्यालयात ओपन डेला पालकांचा उस्फूर्त प्रतिसाद

पारनेर (समर्थ गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या भाळवणी येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवार, दिनांक ७ ऑक्टोबर रोजी आयोजित ओपन डे उपक्रमाला पालकांचा मोठ्या संख्येने आणि उस्फूर्त प्रतिसाद लाभला. आपल्या पाल्यांची सर्वांगीण प्रगती जाणून घेण्यासाठी पालक वर्गनिहाय उपस्थित राहिले. यावेळी प्रत्येक वर्गाचे शिक्षक आपल्या वर्गासमोर बसलेल्या पालकांशी थेट संवाद साधत होते. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील प्रगती, वर्तणूक, उपस्थिती आणि एकूण कामगिरीची माहिती पालकांना देण्यात आली. पालकांच्या अपेक्षा जाणून घेतल्या आणि त्या पूर्ण करण्यासाठी शाळा व घर यांच्या समन्वयातून काय करता येईल, यावर सविस्तर चर्चा झाली. चाचणी परीक्षेचे उत्तरपत्रिका पालकांना दाखवण्यात आल्या. आपला पाल्य कोणत्या विषयात कच्चा आहे, कोणत्या भागात अधिक सराव हवा आहे, हे स्पष्ट करण्यात आले. शिक्षक-पालक समन्वयातून त्याची प्रगती कशी साधता येईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची आणि स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाची माहिती पालकांना देण्यात आली. उपक्रमानंतर पालकांनी समाधान व्यक्त केले. आपले अभिप्राय अभिप्राय नोंदवहीत नोंदवले. प्रत्येक परीक्षेनंतर ओपन डे आयोजित करण्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. हा उपक्रम विद्यालयाचे स्कूल कमिटी सदस्य आणि रयत शिक्षण संस्थेचे सल्लागार समिती सदस्य श्री संदीप रोहोकले यांच्या संकल्पनेतून कोरोना काळानंतर सन २०२३ मध्ये प्रथम पथदर्शी स्वरूपात या विद्यालयात राबविण्यात आला होता. त्याची दखल घेऊन रयत शिक्षण संस्थेने हा उपक्रम संपूर्ण संस्थेसाठी निवडला. आता संस्थेच्या सर्व विद्यालयांमध्ये ओपन डे नियमितपणे घेतला जातो. यापूर्वी पालकांचा प्रतिसाद तुलनेने कमी होता. यावेळी मात्र मोठ्या संख्येने पालक उपस्थित राहिल्याने विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यातील संवाद अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले. या समन्वयाचा फायदा निश्चितच विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी होणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### राज्यव्यापी दौऱ्यात महाखनिजबाबत एकही तक्रार येता कामा नये

#### मंत्री बावनकुळेंचे निर्देश

महाखनिज २.० प्रणालीतील तांत्रिक अडथळे तातडीने दूर करा. पोर्टल संथ होणे, वारंवार एरर येणे किंवा प्रणालीतील अडचणींमुळे नागरिकांची गैरसोय होता कामा नये. येत्या दहा दिवसांत महाखनिजमध्ये स्पष्ट सुधारणा दिसली पाहिजे; अन्यथा संबंधितांवर कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिला. महाखनिज २.० शी संबंधित विविध विभागांच्या प्रणाली एकमेकांशी जोडून कामकाज अधिक सुरळीत करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. बांधकाम परवानग्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या बीपीएमएस किंवा ऑटो डीसीआर प्रणाली महाखनिज २.०शी तातडीने जोडाव्यात, तसेच संबंधित विभागांनी याबाबत आवश्यक आदेश काढून संलग्नीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले. विविध विभागांकडील प्रकल्प, कंत्राटदार आणि गौण खनिजांशी संबंधित माहिती महाखनिजवर नोंदवून ती नियमित अद्ययावत ठेवावी.

# प्रतिभावान शिक्षक आणि गुणी विद्यार्थी हीच शाळेची खरी श्रीमंती : डॉ. रमेश झरकर

## भारत विद्यालय मिरजगाव येथे आदर्श शिक्षक, प्रज्ञाशोध शिष्यवृत्तीधारक व क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

विद्यालयाच्या प्रगतीमध्ये प्रतिभावान शिक्षक आणि विद्यार्जन करणारे गुणी विद्यार्थी असतील,तर लौकिक अर्थाने शाळा श्रीमंत होण्यास वेळ लागणार नाही.असे मत विद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर यांनी व्यक्त केले.

भारत विद्यालय मिरजगाव येथे आदर्श शिक्षक कल्याण गवारे आणि महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी, तसेच तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये यशस्वी ठरलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र गोरे,माजी प्राचार्य जयवंत मेहत्रे,आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक कल्याण गवारे,प्रज्ञाशोध परीक्षेतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी,खेळाडू तसेच विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर खुरंगे यांनी विद्यालयाची वाढत असलेली गुणवत्ता आणि विद्यालय त्यासाठी करत असलेले प्रयत्न याविषयी माहिती दिली. विद्यालयाच्या प्रगतीबद्दल उपस्थित पालकांनीही समाधान व्यक्त करत विद्यालयासाठी लागणाऱ्या मदतीचे आश्वासन दिले.

महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये जिल्हास्तरीय यादीमध्ये समाविष्ट झालेली कु. पूर्वा वायाळ हिने आपल्या यशामध्ये आई-वडिलांबरोबरच विद्यालयातील शिक्षकांचा मोलाचा वाटा असल्याचे नमूद केले. त्याचबरोबर ट्रेसेबल गिव्हिंग फाउंडेशन हाँगकाँग या फाउंडेशनचे सर्वे सर्वा श्री. नरेश सुराणा व सौ.सीमा सुराणा यांच्याकडून विद्यालयासाठी मिळत असलेल्या शैक्षणिक साहित्याचा व पुस्तकांचाही मोठा वाटा असल्याचे तिने आवर्जून सांगितले.

आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले विद्यालयाचे शिक्षक श्री.कल्याण गवारे यांनी आपल्याला मिळालेल्या पुरस्काराबद्दल दैनिक लोक परिवर्तन,तसेच हिंद सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी व विद्यालयाचे चेअरमन या सर्वांचे आभार व्यक्त केले. आतापर्यंतच्या नोकरी कालावधीमध्ये केलेल्या प्रामाणिक कामाबद्दल तसेच सतत विद्यार्थी हिताचा ध्यास घेऊन केलेल्या अध्यापनामुळेच हा पुरस्कार मिळाल्याचे नमूद करत, उर्वरित नोकरी कालावधीमध्येही सदैव विद्यार्थी हित जोपासणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून सामाजिक कार्यकर्ते श्री. राजेंद्र गोरे यांनी विद्यार्थी आणि उपस्थित पालकांना व्यसनमुक्ती विषयावर मार्गदर्शक व्याख्यान दिले. व्यसनामुळे समाजामध्ये कुटुंबाची होणारी वाताहत आणि त्यामुळे भरडला



जाणारा विद्यार्थी यावर त्यांनी मार्मिक उदाहरणे देत विद्यार्थी आणि पालकांचे प्रबोधन केले.

याप्रसंगी काही पालकांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमानंतर सर्व मान्यवर, पालक आणि विद्यार्थी यांना विद्यालयाच्या वतीने भोजन देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विनोद देसाई यांनी केले, तर आभार श्री. राजेंद्र नवले यांनी मानले.

# टाकळी ढोकेश्वर येथे तुळजाभवानी मातेच्या पालखीचा भव्य उत्सव!

## हजारो भाविकांची उपस्थिती; दुष्काळ दूर होऊन पावसासाठी मातेच्या चरणी साकडे!

टाकळी ढोकेश्वर (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे तुळजाभवानी मातेच्या पालखीचा यात्रा उत्सव रविवारी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. पालखीच्या दर्शनासाठी टाकळी ढोकेश्वरसह परिसरातील विविध गावांमधून हजारो भाविक उपस्थित झाले होते. मातेच्या दर्शनाने भाविक भक्तिरसात न्हाऊन निघाले.

रविवारी रात्री तुळजाभवानी मातेच्या पालखीचे टाकळी ढोकेश्वर येथे आगमन झाले. ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने पालखीचे उत्साहात स्वागत केले. दिवसभर सुरू असलेल्या यात्रा उत्सवात भाविकांनी मातेच्या चरणी श्रद्धा व्यक्त करत दर्शन घेतले. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाचा आनंद घेतला.




संध्याकाळी ढोल-ताशांच्या गजरात आणि वाद्यांच्या निनादात पालखीची मिरवणूक काढण्यात आली. भक्तीगीते, जयघोष आणि नृत्याच्या उत्साहात भाविकांनी तुळजाभवानी मातेला भावपूर्ण निरोप दिला. यावेळी टाकळी ढोकेश्वरच्या ग्रामस्थांनी परिसरावरील दुष्काळाचे सावट दूर व्हावे, भरपूर पाऊस पडून शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी तुळजाभवानी मातेच्या चरणी साकडे घातले.

तुळजाभवानी माता ही शक्तिस्वरूपिणी आदिशक्ती म्हणून महाराष्ट्रासह देशभरातील भाविकांची श्रद्धास्थान आहे. संकटाच्या काळात माता भक्तांना बळ आणि आधार देते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. पालखी उत्सवाच्या निमित्ताने गावात निर्माण झालेले भक्तिमय वातावरण आणि भाविकांची एकजूट यामुळे उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या यात्रोत्सवामुळे टाकळी ढोकेश्वर व परिसरातील ग्रामस्थांमध्ये श्रद्धा, एकता आणि आपुलकीची भावना अधिक दृढ झाली. तुळजाभवानी मातेच्या आशीर्वादाने गावात सुख, समृद्धी आणि समाधान नांदावे तसेच दुष्काळाचे संकट दूर होऊन परिसरात समाधानकारक पाऊस पडावा, अशी भावना यावेळी उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

# दुष्काळग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही!

## पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे आमदार विक्रमदादा पाचपुते यांचे निर्देश

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आमदार ड. विक्रमदादा बबनराव पाचपुते यांनी तालुका प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सविस्तर आढावा घेतला. पावसाअभावी शेतीपिकांचे झालेले नुकसान, शेतकऱ्यांसमोरील अडचणी आणि पीक नुकसानीच्या पंचनाम्यांच्या कामाची सद्यस्थिती याबाबत त्यांनी माहिती घेतली. तसेच पंचनाम्यांचे काम तातडीने पूर्ण करून नुकसानग्रस्त एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले.



तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने शेतीपिकांचे नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत.

या परिस्थितीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ वेळेत मिळणे आवश्यक आहे. यासाठी पंचनाम्यांच्या कामाला गती देऊन प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना आमदार पाचपुते यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पीक नुकसानीचे पंचनामे करताना कोणताही पात्र नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ लवकरात लवकर मिळावा, यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने काम करावे, असे निर्देश देत आमदार पाचपुते यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली. या आढावा बैठकीत तहसीलदारांसह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# 'वाढदिवसाचा आनंद अंध-दिव्यांग बांधवांसोबत'

## प्रथमेश आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीमती अश्विनी आव्हाड यांचा सामाजिक उपक्रम

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

वाढदिवसाचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता तो गरजू व दिव्यांग बांधवांसोबत साजरा करण्याच्या उद्देशाने श्रीमती अश्विनी आव्हाड यांनी आपला मुलगा प्रथमेश आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त अंध व दिव्यांग बांधवांना मिठाईचे वाटप केले. यावेळी अंधोजन मंडळाचे संभाजी भोर व उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.

यावेळी श्रीमती अश्विनी आव्हाड म्हणाल्या, वाढदिवस हा प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा दिवस असतो. हा आनंद गरजू आणि अंध-दिव्यांग बांधवांसोबत वाटून घेतल्याने या दिवसाचे समाधान अधिक वाढते. समाजातील गरजू घटकांसाठी आपल्या परीने काहीतरी करण्याची भावना प्रत्येकाने जपली पाहिजे.

अंधोजन मंडळाचे संभाजी भोर म्हणाले, अंध व दिव्यांग बांधवांसोबत वाढदिवसाचा आनंद साजरा करून श्रीमती अश्विनी आव्हाड यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. अशा उपक्रमांमुळे दिव्यांग बांधवांना आधार आणि आपुलकीची भावना मिळते.



समाजातील प्रत्येक घटकाने अशा प्रकारे संवेदनशीलता जपत गरजूंच्या आनंदात सहभागी व्हावे.

सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून अंध व दिव्यांग बांधवांसोबत आनंदाचे क्षण साजरे करण्यात आले. मिठाईचे वाटप होताच लाभार्थींच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. समाजातील गरजू घटकांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांच्यासोबत आनंद वाटून घेण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच अंध-दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# माळी समाजाचा भव्य वधू-वर मेळावा १ नोव्हेंबरला

## राज्यस्तरीय स्वरूप, विविध समित्या स्थापन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

> **वधू-वर मेळावा हे समाजाच्या एकतेचे आणि पुढच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्याचे व्यासपीठ - अध्यक्ष किशोर डागवाले**

अहिल्यानगर (स.गांवकरी):- आजच्या काळात आपल्या मुला-मुलींसाठी योग्य स्थळ शोधणे ही पालकांची सर्वात मोठी जबाबदारी असते. नोकरी, शिक्षण, व्यवसायामध्ये व्यस्त असलेल्या पालकांना एका छताखाली, एकाच ठिकाणी अनेक सुसंस्कृत, सुशिक्षित स्थळांची माहिती मिळावी, याच उद्देशाने हा वधू-वर परिचय मेळावा आयोजित केला आहे. हा मेळावा फक्त लग्न जुळवण्याचा कार्यक्रम नाही, तर हा आपल्या माळी समाजाची एकता, आपली संस्कृती आणि आपल्या पुढच्या पिढीचे उज्ज्वल भविष्य घडवण्याचे व्यासपीठ आहे.

मेळावा यशस्वी करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या करण्यात आल्या आहेत.वधू-वर मेळाव्याला राज्यस्तरीय स्वरूप प्राप्त होईल ह्या दृष्टीने तयारी सुरू आहे.वधू वर मेळावा यशस्वी करण्यासाठी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

रंगार गल्ली येथील डॉ. एस. टी. महाले सांस्कृतिक भवन येथे अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने वधू-वर पालक परिचय मेळाव्याच्या नियोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले यांच्या प्रमुख उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीस अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,विश्वस्त प्रा.माणिक विधाते, संजय गारुडकर, अनिल इवळे, खजिनदार विनोद पुंड, सचिव अमोल भांबरकर,श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त ज्ञानेश्वर रासकर, प्रकाश इवळे, उद्योजक राजेंद्र ताठे,माळी वधू-वर सूचक मंडळाचे उपाध्यक्ष संजय ताजणे, खजिनदार रमेश चिपाडे, विश्वस्त अशोक हिंगे, सौ.रोहिणी बनकर, मच्छिंद्र बनकर, सुभाष गोंधळे, पत्रकार राजू खरपुडे, गोरख बोरुडे, साहेबराव विधाते, रोहित पठारे,कॅप्टन सुधीर पुंड, इंजि.चंद्रकांत पुंड,समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे, माळी महासंघाचे अध्यक्ष भूषण भुजबळ,मनोज फुलसौंदर,मनोज भुजबळ, संदीप दळवी,गणेश धाडगे,नंदकुमार नेमाने,संजय कानडे,सुधाकर कानडे,अर्जुन गोंधळे,अनिल लोंढे, पंडित औसरकर,प्रा. विष्णू पाबळे,दत्तात्रय वारकड, निलेश चिपाडे,लवेश गोंधळे,सुरेश जाधव,एकनाथ व्यवहारे,दिलीप भांबरकर, भरत गारुडकर, संतोष हजारे, दिनेश कापरे, अमोल रासकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ म्हणाले, लग्न जमविणे हा मोठा गंभीर प्रश्न समाजापुढे आहे. माळी वधू-वर सूचक मंडळातील सर्व पदाधिकारी निस्वार्थपणे वेळ देऊन वधू-वर कार्यालय चालवित आहेत. शहरात वधू-वर मेळावा व्हावा ही मागणी अनेक दिवसांपासून होती. या वधू-वर मेळाव्याचे उत्कृष्टपणे नियोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यासाठी अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उत्साहाने काम करीत आहेत.

प्रा. माणिक विधाते म्हणाले,



या मेळाव्यासाठी राज्याचे बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुल सावे हे मेळाव्याचे उद्घाटक, तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार योगेश टिळेकर व प्रमुख उपस्थिती म्हणून नेवासा-शेवगावचे माजी आमदार पांडुरंग अभंग उपस्थित राहणार आहेत. प्रथमच माळी समाजाच्या वतीने नगर शहरात वधू-वर मेळावा होत असल्याने समाजात उत्साहाचे वातावरण आहे. या मेळाव्यासाठी उपमहापौर धनंजय जाधव यांनी बंधन लॉन्स हे मंगल कार्यालय विनामूल्य उपलब्ध करून दिले आहे.

संजय गारुडकर म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यात माळी समाज मोठ्या प्रमाणात असल्याने प्रत्येक तालुक्यात प्रवास करून मेळावा यशस्वी करण्यासाठी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. जिल्ह्यात संपर्क करून वधू-वर मेळाव्याचा प्रचार करून मोठ्या संख्येने समाजाने सहभागी व्हावे, या हेतूने कार्यकर्ते जिल्ह्यात कार्यरत आहेत.

या बैठकीत संजय ताजणे, मच्छिंद्र बनकर, राजू खरपुडे, अशोक हिंगे, चंद्रकांत पुंड, दत्तात्रय वारकड, संजय कानडे, प्रकाश इवळे, ज्ञानेश्वर रासकर,मनोज फुलसौंदर आदींनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन अमोल भांबरकर यांनी केले, तर आभार संस्थेचे खजिनदार विनोद पुंड यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# टेंभी नाक्याची दुर्गेश्वरी; श्रद्धा, परंपरा आणि उत्साहाचा महासोहळा

## ४८ वर्षांची गौरवशाली परंपरा-यंदा बद्रीनाथ मंदिराची प्रतिकृती ठरणार आकर्षणाचा केंद्रबिंदू

ठाणे (समर्थ गांवकरी)

**ठाणे शहराच्या सांस्कृतिक आणि धार्मिक वैभवात मानाचे स्थान असलेल्या टेंभी नाका येथील नवरात्रोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, यंदाही 'आई दुर्गेश्वरी'च्या दर्शनासाठी लाखो भाविकांची पावले टेंभी नाक्याकडे वळणार आहेत. धर्मवीर आनंद दिघे साहेबांनी सुरु केलेला हा उत्सव त्यांच्या पश्चात शिवसेना मुख्य नेते, उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जात आहे. श्रद्धा, भक्ती, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरेचा सुंदर संगम असलेल्या या उत्सवाला यंदा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. १९७८ मध्ये सुरू झालेल्या या नवरात्रोत्सवाने तब्बल ४८ वर्षांचा प्रवास पूर्ण केला असून, काळ बदलला तरी टेंभी नाक्यावरील देवीप्रती असलेली भाविकांची आस्था आजही तितकीच कायम आहे, अशी भावना ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी आज पत्रकार परिषदेत व्यक्त केली.**

पत्रकार परिषदेला महापौर शर्मिला पिंपळोलकर, गटनेते पवन कदम, ट्रस्ट चे अध्यक्ष उत्तम सोलंकी, नगरसेवक सुधीर कोकाटे, हेमंत पवार, कमलेश चव्हाण, पूजा वाघ आदी मान्यवर उपस्थित होतें.

टेंभी नाका येथील श्री जय अंबे माँ पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दरवर्षी नवरात्रोत्सव मोठ्या भक्तिभावाने उत्साहात साजरा केला जातो. या उत्सवाला ठाणे शहरापुरते मर्यादित स्वरूप न राहता मुंबई, नवी मुंबई आणि महाराष्ट्रातील नव्हे तर देशाच्या विविध भागांतून भाविक उपस्थित राहतात. नवरात्रोत्सवाच्या काळात टेंभी नाका परिसर अक्षरशः भक्तिमय वातावरणाने भारून जातो.

### आनंद दिघेंच्या संकल्पनेतून उत्सवाची मुहूर्तमेढ

टेंभी नाका नवरात्रोत्सवाच्या इतिहासाला स्वर्गीय आनंद दिघे यांच्या सामाजिक जाणिवेची जोड आहे. १९७८ मध्ये धर्मवीर आनंद दिघे साहेबांनी या सार्वजनिक नवरात्रोत्सवाची सुरुवात केली. काळाच्या ओघात हा उत्सव अधिक व्यापक होत गेला. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत गेली आणि टेंभी नाका हे नवरात्रोत्सवाच्या काळात देशातील प्रमुख धार्मिक केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. दिघे साहेबांच्या पश्चात एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव साजरा केला जात आहे.

### 'आई दुर्गेश्वरी'वर भाविकांची अपार श्रद्धा

टेंभी नाका येथील नवरात्रोत्सवाचे सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे 'आई दुर्गेश्वरी'ची भव्य आणि मनोहारी मूर्ती. देवीच्या दर्शनासाठी नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत भाविकांची मोठी गर्दी होत असते. देवीचे दर्शन घेऊन मनोकामना पूर्ण होण्यासाठी प्रार्थना करणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. देवीच्या मूर्तीला असलेले पारंपरिक स्वरूप आणि त्यामागील श्रद्धा यामुळे टेंभी नाक्याची दुर्गेश्वरी ही भाविकांच्या भावविश्वाचा अविभाज्य भाग बनली आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक वर्षानुवर्षे नवरात्रोत्सवाच्या काळात देवीच्या दर्शनासाठी आवर्जून येतात.

### यंदा बद्रीनाथ मंदिराची भव्य प्रतिकृती

यंदाच्या नवरात्रोत्सवाचे आणखी एक मोठे आकर्षण म्हणजे मंडपाची भव्य सजावट. उत्तराखंडमधील श्री बद्रीनाथ मंदिराची प्रतिकृती यंदा साकारण्यात येत असून, भाविकांसाठी हा देखावा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. मंदिराच्या स्थापत्यशैलीची भव्यता आणि आकर्षक विद्युत





रोषणाई यामुळे संपूर्ण परिसराला नवरात्रोत्सवाचे वेगळे रूप प्राप्त होणार आहे. ७१ फूट उंच, १०० फूट रुंद आणि ११० फूट लांबी असलेला हा भव्य देखावा आहे. देखाव्याच्या आतल्या बाजूस ३० फुटांची उंची असून देवीचा गाभारा ४० बाय ४० फूट आहे. ५१ खांबांवर हा भव्य देखावा साकारला गेला आहे. २१ दिवस साईटवर आणि प्रत्यक्ष जागेवर मिळून देखावा साकारण्यासाठी अडीच महिन्यांचा कालावधी लागला आहे. जवळपास ३५० कारागिरांनी मिळून या देखाव्याला आकार दिला आहे. ज्येष्ठ कलादिग्दर्शक अमन विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बद्रीनाथ मंदिराची निर्मिती होत आहे.

### नऊ दिवस भक्तिमय वातावरण

नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत देवीची विविध धार्मिक पद्धतीने पूजा-अर्चा केली जाते. सकाळपासूनच देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी सुरू होते. संध्याकाळच्या वेळी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. परिसरात होणारी विद्युत रोषणाई, धार्मिक कार्यक्रम आणि भक्तिगीतांमुळे वातावरण अधिकच भक्तिमय होते.

आई जगदंबेच्या मंगलमय दर्शनासाठी आपण सहकुटुंब अवश्य यावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. मंडळाचे अध्यक्ष उत्तमचंद सोळंकी, सचिव हेमंत पवार, उपसचिव सुधीर कोकाटे, खजिनदार कमलेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे कार्यकर्ते, शिवसैनिक, महिला आघाडी, युवा सेनेचे कार्यकर्ते उत्सव यशस्वी होण्यासाठी मेहनत घेत आहेत.

# नाना पाटेकर यांच्या निधनाने अस्सल कलाकार आणि दिलदार माणूस गमावला

## माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील

मंचर (समर्थ गांवकरी)

चित्रपट अभिनेते आणि सामाजिक क्षेत्रात भरीव काम करणारे नाना पाटेकर यांच्या निधनाने अस्सल कलाकार आणि दिलदार माणूस गमावला.अशी प्रतिक्रिया माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आणि मन सुन्न करणारी आहे. कोकणच्या मातीतून आलेल्या या अस्सल कलावंताने आपल्या अभिनयाच्या ताकदीवर चित्रपटसृष्टीत वेगळे स्थान निर्माण केले. त्यांच्या दमदार संवादफेकीने आणि प्रभावी भूमिकांनी रसिकांच्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटविला.पडद्यावर कडक आणि रोखठोक दिसणारे नाना पाटेकर प्रत्यक्ष जीवनात अत्यंत संवेदनशील आणि हळव्या मनाचे होते.'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी बांधवांना आधार देत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली.

# आंबेगाव-जुन्नरमध्ये 'वृक्षमित्र अभियानातून वृक्षवाटप व वृक्षारोपण

मंचर (समर्थ गांवकरी)



मैत्री हेल्थ केअर सेवाभावी संस्था मंचर, माई बहुउद्देशीय संस्था, पुणे आणि त्रिशक्ती उद्योग समूह, जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील विविध गावांमध्ये 'वृक्षमित्र अभियान' राबविण्यात आले.या अभियानांतर्गत सुमारे ३०० ते ५०० विविध वृक्षांची रोपे ग्रामस्थांना वाटप करून वृक्षारोपण करण्यात आले.

आंबा, जांभूळ, पेरू यांच्यासह विविध पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड ग्रामस्थांच्या सहभागातून करण्यात आली.पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे हा अभियानाचा उद्देश आहे. लावलेले प्रत्येक झाड जगविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# ज्ञानसंपदा शाळेत आंतरशालेय कथाकथन स्पर्धा उत्साहात संपन्न

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)




ज्ञानसंपदा शाळेमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची 'आंतरशालेय कथाकथन स्पर्धा' अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत शहर आणि परिसरातील विविध शाळांतील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

स्पर्धेचा सविस्तर निकाल

छोटा गट इयत्ता पाचवी ते सातवी मराठी-- प्रथम रुही पिंगळे (रेणावीकर हायस्कूल) द्वितीय सक्षद लोखंडे ( ऑक्सिलियम स्कूल) तृतीय अनुष्का टकले ( ऑक्सिलियम स्कूल) उत्तेजनार्थ मृणाल कोळी (गॅलेक्सी स्कूल)

इंग्रजी -प्रथम देवकी शिरोळे (रामकृष्ण स्कूल) आलिशा शेख (अशोक भाऊ फिरोदिया) आरोही टेकाळे (श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल) उत्तेजनार्थ सौमित्रा कुलकर्णी (ऑक्सिलियम स्कूल) विशेष उत्तेजनार्थ सिया साठे (ज्ञानसंपदा स्कूल)

हिंदी-- प्रथम रुद्र रासकर (रामकृष्ण स्कूल), द्वितीय नंदिश साखरवाडे (ऑक्सिलियम स्कूल), तृतीय पलक आनंदकर (रामकृष्ण स्कूल), उत्तेजनार्थ शुभ्रा होले (अशोक भाऊ फिरोदिया)

मोठा गट इयत्ता आठवी ते दहावी

मराठी --प्रथम मृण्मयी पादिर (श्री साई स्कूल), द्वितीय स्वरांजली किंबहुने (अशोक भाऊ फिरोदिया) तृतीय मिताली कुलकर्णी (रेणावीकर शाळा), उत्तेजनार्थ उर्वी शास्त्री (गॅलेक्सी नॅशनल स्कूल)

हिंदी- प्रथम चैताली चौगुले (रामकृष्ण स्कूल), द्वितीय सारा रणधीर (मॉडेल इंग्लिश स्कूल ),तृतीय अर्जुन पुरी ( ऑक्सिलियम स्कूल ), उत्तेजनार्थ अंश गुगळे (अशोक भाऊ फिरोदिया)

इंग्रजी प्रथम तनिष्का शहाणे ( ऑक्सिलियम स्कूल), द्वितीय आराध्या सुरपूरिया (भाऊसाहेब फिरोदिया), तृतीय आर्या जाधव (अशोक भाऊ फिरोदिया), उत्तेजनार्थ अभिनव ब्राह्मणे (अशोक भाऊ फिरोदिया)

परीक्षक म्हणून स्वाती रानडे, मयुरा केळकर(हिंदी), श्रुती फडके, आरुषा कोल्हटकर(इंग्रजी), प्रसन्न पाठक, तेजस अतितकर, अनघा अत्रे, निर्मला नगरकर.(मराठी) यांनी काम पाहिले.

सूत्रसंचालन प्रसाद बर्वे यांनी केले. तर या स्पर्धेचे नियोजन स्पर्धा समन्वयक श्रीमती स्वाती तवले यांनी सांभाळले. शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली या प्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विजेत्या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# प्रभावी अभिव्यक्तीचा नटसम्राट हरपला

## नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांची श्रद्धांजली

शिर्डी (समर्थ गांवकरी)

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अढळ स्थान निर्माण करणारे, आपले विलक्षण अभिनय सामर्थ्य आणि शेतकऱ्यांप्रती संवेदना असणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने मनाला तीव्र वेदना झाल्या आहेत. जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपल्या शोकसंदेशात नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

मंत्री विखे पाटील यांनी आपल्या संदेशात म्हटले की, नानांचा अभिनय म्हणजे सहजता, वास्तववाद आणि प्रभावी अभिव्यक्तीचा अनोखा संगम होता. 'नटसम्राट' असो की 'क्रांतीवीर', त्यांच्या भारदस्त आवाजाने आणि वैशिष्ट्यपूर्ण संवादफेकीने भारतीय चित्रपटसृष्टीला एक वेगळी उंची मिळवून दिली. त्यांच्या अनेक भूमिका आणि संवाद पुढील कित्येक पिढ्यांच्या स्मरणात राहतील.

नाना पाटेकर यांच्याशी असलेल्या आपल्या जिव्हाळ्याच्या संबंधांना उजाळा देताना मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, नानांशी त्यांचे अत्यंत आपुलकीचे आणि मैत्रीचे ऋणानुबंध होते. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या कृषी आणि जलक्षेत्रातील कामाप्रती नानांना नितांत आदर होता आणि त्या दोघांमध्ये घनिष्ठ मैत्री होती. मनात असेल ते स्पष्टपणे बोलणारा, कोणताही दिखाऊपणा न करता माणुसकी जपणारा आणि सामाजिक प्रश्नांबद्दल तळमळणारा हा माणूस नेहमीच भावल्याचे त्यांनी नमूद केले.

काही दिवसांपूर्वीच झालेल्या भेटीत, राज्यात जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामात तसेच दुष्काळमुक्त महाराष्ट्र करण्याच्या प्रयत्नांमध्ये स्वतः हून योगदान देण्याची तयारी नानांनी दर्शवली होती. 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागातील जलसंधारणाची कामे आणि संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना दिलेला मदतीचा हात यातून त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वाची प्रचिती सतत येत राहिली. प्रसिद्धीच्या झगमगाटापलीकडे जाऊन सर्वसामान्यांच्या वेदनांशी एकरूप होणारा हा कलावंत खऱ्या अर्थाने माणुसकीचा चेहरा होता, असे गौरवोद्गार



पालकमंत्र्यांनी काढले.

नानांच्या निधनाने भारतीय कलाविश्वातील एक तेजस्वी पर्व संपुष्टात आले असून त्यांचे कलाक्षेत्रातील योगदान, समाजकार्य आणि स्नेहबंधांच्या आठवणी कायम हृदयात जपल्या जातील, अशा शब्दांत त्यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

# एक तप 'वनवास' भोगत समर्पणाने संसार फुलविला

## शकुंतला मावशींच्या सेवेमुळे संसाराचे सोने झाले

अकोले (समर्थ गांवकरी)

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत एक तप 'वनवास' भोगत, कष्ट आणि समर्पणाने आयुष्य वेचणाऱ्या शकुंतला मावशी दहितुले यांनी कुटुंबासाठी केलेला संघर्ष आणि विद्यालयात बजावलेली प्रामाणिक सेवा प्रेरणादायी आहे. त्यांच्या कष्ट, त्याग आणि जिद्दीमुळे संसाराचे सोने झाले, असे गौरवोद्गार माजी आमदार वैभव पिचड यांनी काढले.

श्री स्वामी समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजूर येथे ३४ वर्षे निष्ठेने सेवा बजावलेल्या श्रीमती शकुंतला राजेंद्र दहितुले यांच्या सेवापूर्ती सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांच्या प्रदीर्घ सेवाकाळातील योगदानाचा भावपूर्ण गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कोषाध्यक्ष संतोष बनसोडे होते. संस्थेचे सचिव बापू काळे, मुख्याध्यापिका मंजुषा काळे, विलास महाले, विलास तुपे, श्रीनिवास यलमामे, आनंद नवाळी, दर्शन ओहरा, रमेश दहितुले, एडीसी बँकेचे व्यवस्थापक विलास कडाळी, प्रेमानंद पवार, गोकुळ कानकाटे, राजेंद्र मैड, वर्षाताई शेलार, रजनी टिबे, गणपत देशमुख, आनंद घाणे, मीरा नरसाळे, सचिन देशमुख, तृप्ती दहितुले, महेश दहितुले, अमोल दहितुले आदी उपस्थित होते.

मुख्याध्यापक सतीश काळे यांनी प्रास्ताविक केले. माजी आमदार वैभव पिचड यांच्या हस्ते दहितुले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापिका मंजुषा काळे यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. त्यात दहितुले यांच्या सेवाकाळातील कर्तव्यनिष्ठा, साधेपणा, प्रामाणिकपणा आणि विद्यालयासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला.

पिचड म्हणाले, एखाद्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर करण्यासाठी सातत्य, संयम आणि मेहनत आवश्यक असते. दहितुले यांनी आपल्या सेवाकाळात याच भावनेने काम केले. वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर निवृत्तीचा टप्पा आला असला, तरी विद्यालयाशी त्यांचे भावनिक नाते कायम राहील.

नाईक पदावर काम करताना त्यांनी विद्यालयातील प्रत्येक जबाबदारी आपुलकीने पार पाडली. पूर्वीच्या काळात संगणकाची सुविधा नसतानाही अनुभव आणि बुद्धीच्या जोरावर त्यांनी कामकाज सांभाळले. नाईक पद म्हणजे एका अर्थाने 'सुपर कॉम्प्युटर'च आहे; अनेक गोष्टी मनात अपलोड करून ठेवलेल्या असतात, अशी मिश्कील टिप्पणी करत पिचड यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी दहितुले यांना उत्तम आरोग्य व आनंदी निवृत्ती जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

**माजी आमदार वैभव पिचड; सेवाभाव, प्रामाणिकपणा व कर्तव्यनिष्ठेचा सेवापूर्ती सोहळ्यात गौरव**

### 'आईची राहणी साधी; मात्र माणुसकी मोठी'

सुनबाई तृप्ती दहितुले यांनी भावनिक मनोगत व्यक्त करताना सांगितले, आईची राहणी साधी असली, तरी माणुसकी मात्र मोठी आहे. त्यांनी आयुष्यभर जपलेले संस्कार आणि माणुसकीची शिदोरी आम्हाला मिळाली. आता त्यांनी धावपळ थांबवून










नातवंडांमध्ये रमावे आणि त्यांच्या बालपणाचा आनंद घ्यावा.

मुलगी मानसी राऊत यांनी आईच्या संघर्षमय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीला हातभार लावण्यासाठी पगार नसतानाही रात्रीच्या वेळी गोधड्या शिवणे, पापड लाटणे तसेच विविध कष्टाची कामे करून त्यांनी कुटुंबाला आधार दिला. त्यांच्या या संघर्षातून पुढील पिढीला कष्ट, जिद्द आणि संस्कारांची प्रेरणा मिळाली, असे त्यांनी सांगितले.

विद्यालयाच्या वतीने किरण भागवत यांनी दहितुले यांना शुभेच्छा दिल्या.

### 'वाढदिवस आणि सेवापूर्तीचा दुग्धशर्करा योग'

संस्थेचे सचिव बापू काळे म्हणाले, वाढदिवस आणि सेवापूर्ती हा दुग्धशर्करा योग आहे. दहितुले यांनी अनेक वर्षे विद्यालयात मनापासून सेवा केली. विद्यालयाच्या इमारतींना पाणी मारण्यापासून विविध जबाबदाऱ्या त्यांनी निष्ठेने पार पाडल्या. त्यांच्या सातत्यपूर्ण कामातून सेवाभावाचा वटवृक्ष उभा राहिला आहे.

सेवापूर्तीच्या निमित्ताने संस्थेच्या वतीने दहितुले यांना वटवृक्षाचे रोपटे भेट देण्यात आले. हे रोपटे त्यांच्या सेवाभावाचे, संस्कारांचे आणि विद्यालयाशी असलेल्या अतूट नात्याचे प्रतीक असल्याचे काळे यांनी सांगितले. त्यांच्या निवृत्तीमुळे नवीन पिढीला संधी मिळणार असून, त्यांनी केलेल्या चांगल्या कार्याची ही समाजाकडून मिळालेली पोहोचपावती आहे, असेही त्यांनी नमूद केले. निवृत्तीनंतर दहितुले यांनी आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. 'विद्यालयाचे प्रेम आयुष्यभर स्मरणात राहील'

सत्काराला उत्तर देताना शकुंतला दहितुले भावूक झाल्या. आजचा दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय, भावनिक आणि आनंदाचा आहे. या विद्यालयाशी जोडलेले नाते मी कधीही विसरू शकणार नाही. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत कष्ट करत संसार उभा केला. आज माझे कुटुंब चांगल्या स्थितीत उभे आहे, याचा मला मनस्वी अभिमान आहे, असे त्यांनी सांगितले.

विद्यालयाने दिलेले प्रेम, सन्मान आणि आपुलकी आयुष्यभर स्मरणात राहील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचा समारोप महेश दहितुले यांनी आभार मानून केला. यावेळी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, कुटुंबीय, नातेवाईक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.